# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३ / आषाढ २६, १९४५ (शके)**

| | | |
|---|---|---|
| (१) | मुख्यमंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | उप मुख्यमंत्री | |
| (३) | आदिवासी विकास मंत्री | |
| (४) | गृहनिर्माण मंत्री | |
| (५) | बंदरे मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४९**

---

### राज्यात महिलांवरील लैंगिक अत्याचारांच्या व बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(१) * १९४८८ श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.सचिन अहिर, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अंबादास दानवे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, ॲड.अनिल परब, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिलांवरील लैंगिक अत्याचार व अन्य प्रकारच्या गुन्हयांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून त्यात महाराष्ट्र राज्य देशात तिसऱ्या क्रमांकावर असल्याचा अहवाल केंद्र शासनाच्या गृह विभागाने जारी केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला जिल्ह्यातून प्रेम, लग्नाचे आमिष दाखवून मुली पळवून नेण्याच्या घटना घडत असून पोलिसांच्या संकेतस्थळावरील माहितीनुसार सन २०२३ मध्ये ३२५ हून मुली, महिला, वृध्द महिला बेपत्ता अथवा त्यांचे अपहरण झाल्याची नोंद असून, अद्यापही जिल्ह्यातील ११६ मुली बेपत्ता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातून रोज सरासरी ७० मुली बेपत्ता होत असल्याची तसेच शहरी भागापेक्षा ग्रामीण भागामध्ये मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण जास्त असून, परभणी तसेच पुण्यातून २२५८, नाशिकमधून १६१, कोल्हापूर ११४, ठाणे १३३, अहमदनगर १०१, जळगाव ८१, सोलापूर ११९ तर सांगलीतून ८२ मुली बेपत्ता झाल्या असून, त्यात १८ ते २५ वयोगटातील मुली तसेच महिला बेपत्ता होण्याचे प्रमाण चिंताजनक असून अल्पवयीन मुलींच्या बेपत्ता झालेल्याची नोंद नसल्याचे निदर्शनास येते, मिसिंग सेलने मुली बेपत्ता

होण्याची कारणे शोधून उपाययोजना करणे गरजेचे असून बेपत्ता झालेल्या सज्ञान मुली व अल्पवयीन मुलींसंदर्भात पोलिसांच्या संकेतस्थळावर नोंद करण्याबाबतची कार्यपध्दती काय आहे,
(४) असल्यास, राज्यात माहे जानेवारी, २०२३ ते मार्च, २०२३ या कालावधीत ५६१० महिला व मुली बेपत्ता झाल्याचे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांनी आपल्या अहवालात नमूद केले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले असून याबाबत महिला आयोगाने शासनास व संबंधित विभागाला सूचना देऊन कारवाई करण्याबाबत तसेच अहवाल सादर करण्यासाठी निर्देश दिलेले असून या प्रकरणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा आणि पोलीस महानिरीक्षक यांची दिनांक २४ मे, २०२३ रोजी मुंबईत बैठक झाली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, माहे जुलै, २०२३ अखेर किती बेपत्ता झालेल्या महिला व मुलींचा शोध लागला आहे व अजून किती महिला व मुली बेपत्ता आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील महिलांवरील अत्याचार कमी करणे व अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या गंभीर प्रश्नाबाबत "ऑपरेश मुस्कान" सारख्या शोध मोहिम राबवून बेपत्ता मुलींचा शोध घेण्याबाबत तसेच महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी कोणत्या कठोर उपाययोजना व कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) क्राईम इन इंडिया, २०२१ च्या प्रकाशित अहवालानुसार महिलांवरील अत्याचाराबाबत महाराष्ट्र राज्य देशात तिसऱ्या क्रमांकावर असून क्राईम रेट नुसार महाराष्ट्र राज्य देशात बाराव्या क्रमांकावर आहे.
(२) अकोला जिल्ह्यातून जानेवारी, २०२३ ते जून, २०२३ दरम्यान एकूण ८९ मुली अपहृत झाल्या आहेत त्यापैकी ६७ मुलींचा शोध घेण्यात आला आहे. अकोला जिल्ह्यात १८ वर्षावरील जानेवारी, २०२३ ते जून, २०२३ दरम्यान एकूण ३३६ महिला बेपत्ता असून त्यापैकी २४० महिला सापडल्या आहेत.
(३) राज्यात बेपत्ता मुलींची आकडेवारी (माहे जाने.ते मे,२०२३) पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | जिल्हा/ शहर | बेपत्ता अल्प-वयीन मुली | सापडलेल्या अल्पवयीन मुली | बेपत्ता महिला | सापडलेल्या महिला |
|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे शहर (जाने.ते जून) | २७५ | २१३ | ८४५ | ४९६ |
| २ | पुणे ग्रामीण | १७७ | ११६ | ७८१ | १६२ |
| ३ | नाशिक शहर | ११९ | ७७ | ४६२ | २९१ |
| ४ | ठाणे ग्रामीण | ५३ | ४० | १६९ | १२८ |
| ५ | ठाणे शहर | ५१४ | ४३८ | २०७८ | १४३८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | अहमदनगर | २०६ | १४८ | ८६२ | ६६७ |
| ७ | जळगांव | १२८ | ६३ | ५८५ | ३४८ |
| ८ | सोलापूर शहर जाने.ते जून) | ४९ | ३६ | २३२ | १८५ |
| ९ | सोलापूर ग्रामीण | ११९ | ८९ | ४९५ | ३६३ |
| १० | सांगली | १३५ | ४८ | ५०५ | ३९ |
| ११ | कोल्हापूर | १०२ | ६५ | ७६८ | ३१४ |

१८ वर्षाखालील बालकांचा शोध घेण्याकरीता www.trackthemissingchild.gov.in या संकेतस्थळाच्या माध्यमाने प्रयत्न करण्यात येतात.

(४) राज्यातील महिला व मुली बेपत्ता होत असल्याबाबत मा.अध्यक्षा,राज्य महिला आयोग आणि पोलीस महानिरीक्षक यांची दिनांक १५ मे २०२३ रोजी बैठक पार पडली.

(५) माहे जानेवारी, २०२३ ते मे, २०२३ या कालावधीतील राज्यातील महिला व मुलींच्या अपहरणाबाबतची माहिती

| अ.क्र. | राज्य | दाखल गुन्हे | एकूण बळीत | मिळुन आलेल्या महिला | मिळुन न आलेल्या महिला |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र | ४०५१ | ४१०८ | २७०६ | १४०२ |

जाने. २०२३ ते मे २०२३ या कालावधीतील राज्यातील महिला व मुली बेपत्ता बाबतची माहिती

| अ.क्र. | राज्य | दाखल मिसींग प्रकरणे | एकूण मिसींग महिला | मिळुन आलेल्या महिला | मिळुन न आलेल्या महिला |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र | १७५९७ | १७६७४ | ११०९७ | ६५७७ |

(सदर दोन्ही तक्त्यात मुंबई शहर घटकाची जानेवारी ते एप्रिल, २०२३ महिन्याची माहिती समाविष्ट असून मे महिन्याची माहिती समाविष्ट नाही.)

राज्यात महिला व बालकांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी सर्व पोलीस घटकांमध्ये

४५ अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे राज्यस्तरीय नोडल अधिकारी म्हणून विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, म.रा., मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. १८ वर्षाखालील मुल हरविलेबाबत तक्रार प्राप्त झाल्यास भा.द.वि. कलम ३६३ अन्वये अपहरणाचा गुन्हा नोंद करण्यात येतो. हरविलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी ऑपरेशन मुस्कान ही शोध मोहिम वेळो-वेळी राबविण्यात येते. महिला सुरक्षेसाठी पोलीस काका, पोलीस दीदी अशा संकल्पना पोलीस स्टेशनस्तरावर राबविण्यात येत आहेत.

-----------------

## मनोरी खाडीवर रो-रो जेट्टी बांधण्यासाठी भराव टाकून खारफुटीची कत्तल करण्यात येत असल्याबाबत

**(२) * १८९४४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, प्रा.राम शिंदे, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून मुंबई उपनगरातील मनोरी खाडीत खारफुटींची (कांदळवन) कत्तल करून प्रवासी जेट्टी शेजारी दगड व मातीच्या भरावाचे बांधकाम सुरू असल्याची बाब माहे मे, २०२३ च्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनोरी ते चौक हा धारावी बेटाचा भाग असून, सदर बेट हे कांदळवनाने वेढलेले पर्यावरण संपन्न व संवेदनशील क्षेत्र असतानाही, रो-रो जेट्टीसह विविध पायाभूत प्रकल्पांसाठी कोणताही पर्यावरणीय प्रभाव मुल्यांकन अभ्यास न करता तसेच अन्य आवश्यक त्या परवानग्या घेतल्या नसल्याचे धारावी बेट बचाव समितीने माहितीच्या अधिकारांतर्गत उघडकीस आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मनोरी खाडीवर सुरु असलेल्या कामाची तसेच रो-रो जेट्टीच्या बांधकामासाठी कांदळवनांची कत्तल करणाऱ्या संबंधितांची शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीच्या अनुषंगाने खारफुटींची (कांदळवन) कत्तल करणाऱ्या महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुरजागड (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) प्रकल्पाच्या ओव्हरलोड वाहतुकीमुळे अपघातांच्या घटनामध्ये वाढ झाल्याबाबत.

**(३) * १९३६३ श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरजागड (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) प्रकल्पाच्या ओव्हरलोड वाहतुकीमुळे अपघाताच्या घटना घडत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यावर दिनांक २० मे, २०२३ रोजी एका शिक्षकाचा मृत्यू तर दिनांक ३० एप्रिल,२०२३ रोजी १२ वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाल्याची घटना घडली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सुरजागड प्रकल्पाच्या ओव्हरलोड वाहतुकीमुळे होणारे अपघातांना आळा घालण्याबाबत शासन व जिल्हा प्रशासनाने काही उपाययोजना केली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १४/०५/२०२३ रोजी एका १२ वर्षीय मुलीचा तर दिनांक २०/०५/२०२३ रोजी एका शिक्षकाचा अपघाती मृत्यू झाला आहे.

(३) सुरजागड प्रकल्पाच्या वाहतूकीमुळे एका १२ वर्षीय मुलीचा मृत्यू झाल्याबाबत अप क्र.१२१/२०२३ भा.द.वि.कलम २७९, ३३७, ३०४(अ) सह मो.वा.का. १३४(अ)(ब), १८४ अन्वये दिनांक १४/०५/२०२३ रोजी तसेच शिक्षकाच्या अपघाती मृत्यूबाबत अप क्र.१७४/२०२३, भा.द.वि.क.२७९, ३३८, ३०४(अ) सह मो.वा.का. क.१३४, १७७, १८४ अन्वये दिनांक २०/०५/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

अपघातांना आळा घालण्याकरीता वेळोवेळी नाकाबंदी लावून सदरची वाहने ओव्हरलोड आहे किंवा कसे याबाबत तपासणी करण्यात येते.

मुख्य रस्त्यावर पुरेशा प्रमाणात ट्रॅफिक अंमलदार नेमण्यात आले असून अपघात होणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मौजे डोळेवाडी (ता.जामखेड, जि.अहमदनगर) येथील पोलीस पाटील पदासाठी असलेल्या आरक्षणात बदल करण्याबाबत.

**(४) * १९६४३ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे डोळेवाडी (ता.जामखेड, जि.अहमदनगर) येथील पोलीस पाटील पदासाठी असलेल्या आरक्षणात बदल करण्याची मागणी ग्रामपंचायत राजुरी यांनी शासनाकडे केली असल्याची बाब माहे मार्च,२०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे डोळेवाडी (ता.जामखेड, जि.अहमदनगर) येथे पोलीस पाटील पदासाठी असलेल्या आरक्षणातील कोणतीही कुटुंबे वास्तव्यास नसल्यामुळे हे पद रिक्त राहणार असल्याचे ग्रामपंचायत राजुरी यांनी शासनास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मौजे डोळेवाडी येथील पोलीस पाटील पदाचे आरक्षण बदलण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सरपंच / उपसरपंच, ग्रा. पं. राजुरी, ता.जामखेड, जि.अहमदनगर यांनी उपविभागीय अधिकारी, कर्जत यांना दिनांक १३/०३/२०२३ च्या पत्रान्वये कळविले आहे.
(३) जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडून सदर प्रकरणी चौकशी करून सविस्तर अहवाल मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेवगाव (जि.अहमदनगर) तसेच अकोला (जि.अकोला) येथील जुन्या शहरात छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त काढलेल्या मिरवणूकीवेळी दंगल झाल्याबाबत

**(५) * १९६०५ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सचिन अहिर, श्री.अंबादास दानवे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेवगाव (जि.अहमदनगर) येथे दिनांक १३ मे, २०२३ रोजी तसेच अकोला (जि.अकोला) येथील जुन्या शहरात छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त काढलेल्या मिरवणूकीच्या वेळी शहरात दोन जमावांमध्ये दंगल होऊन दगडफेक, दुकाने जाळणे, गाड्या जाळणे, इत्यादी प्रकार घडल्याचे दिनांक १४ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी पोलिसांनी ३१ जणांना ताब्यात घेतले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दंगलीत ९ व्यक्ती गंभीर जखमी झाल्या असून दंगल आटोक्यात येत नसल्यामुळे पोलिसांनी गोळीबार केला, या गोळीबारात एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने दंगलसदृष्य वातावरण तयार करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

शेवगाव (जि.अहमदनगर) येथे छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त दिनांक १४/५/२०२३ रोजी काढलेल्या मिरवणूकीच्या वेळी दोन गटांमध्ये दंगल झाली आहे. मात्र अकोला (जि.अकोला) येथे शहरातील छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त दिनांक १४/५/२०२३ रोजी काढलेल्या मिरवणुकीच्या वेळी दंगल झाल्याची घटना घडलेली नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

घटनेच्या अनुषंगाने शेवगाव, जि.अहमदनगर येथे आजपावेतो ५० आरोपींना ताब्यात घेतले असून ३ विधिसंघर्षित बालकांना मा.न्यायालयात दाखल करतेवेळी हजर राहण्याची समज देऊन सोडून दिले व इतर ४७ आरोपी हे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

(३) शेवगाव, जि.अहमदनगर येथील घटनेमध्ये १० व्यक्ती गंभीर जखमी झाल्या आहेत. दंगल आटोक्यात येत नसल्यामुळे पोलीसांनी सौम्य लाठीमार केला व दंगल आटोक्यात आणली.

(४) शेवगांव पो. स्टे. येथे गु.र.क्र. ४१८/२०२३, गु.र.क्र. ४१९/२०२३ आणि गु.र.क्र. ४२०/२०२३ असे ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महावितरण कंपनीने केलेली वीज दरवाढ कमी करण्याबाबत

**(६) * १९०७६ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अरुण लाड, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सचिन अहिर, प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य विद्युत नियामक आयोगाने महावितरणचा रुपये ६७ कोटी रूपयांचा तोटा भरून काढण्यासाठी वीज दरवाढ करण्याच्या प्रस्तावास दिलेल्या मंजुरीनुसार शासनाने दिनांक १ एप्रिल, २०२३ पासून सन २०२३-२०२४ साठी २.९ % व सन २०२४- २०२५ साठी वीज दरात ५.६ % वाढ केली असून, सदर दरवाढ अन्य राज्याच्या तुलनेत सरासरी २१.६५ % इतकी अधिक असल्याने वीज ग्राहकांनी आंदोलने, मोर्चे काढून दरवाढ कमी करावी अशी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शीतगृहांच्या वीज देयकात महावितरण कंपनीने दिनांक १ एप्रिल, २०२३ पासून ४० टक्क्यांपर्यंत व दिनांक १ एप्रिल, २०२४ पासून ५० टक्क्यांपर्यंत वाढ प्रस्तावित केल्यामुळे राज्यातील अन्न साठवणूक व अन्नप्रक्रिया उद्योगावरही याचा परिणाम होऊन थेट ग्राहकांना याचा आर्थिक फटका बसणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात मल्टी आणि सिंगल सुविधांचे सुमारे २५० हून अधिक शीतगृहे असून सदर दरवाढ मागे घेऊन महावितरणच्या मल्टी इयर टेरिफ ऑर्डरनुसार दरवर्षी निर्धारित दराने वीज दरवाढ करण्यात यावी अशी मागणी महा कोल्ड स्टोरेज आणि नवी मुंबई असोसिएशनने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतीपंपाच्या वीजेच्या दरातही सन २०२२ ते २०२५ पर्यंतची दरवाढ प्रस्तावित करण्यात आली असून, शेतीसाठी वीजपुरवठा करण्यात येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन “शेतकऱ्यांना न मागता भारनियमनाची भरपाई देण्यात यावी, ‘स्वतंत्र कृषी वीज पुरवठा कंपनी’ सुरू करावी, कृषी पंप ग्राहकांना दिली जाणारी क्रॉस सबसिडी कायम ठेवावी तसेच कृषी दराचा फेरविचार करावा’ असे वीज नियामक आयोगाने शासनास सुचविले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वीज ग्राहक जनतेचा विरोध लक्षात घेऊन विद्युत वितरण कंपनी तसेच राज्य विद्युत नियामक आयोगाकडे प्रस्ताव पाठवून वाढीव वीज दर कमी करण्यात येईल असे मा.उप मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांनी माहे एप्रिल, २०२३ मध्ये जनतेस प्रसारमाध्यमांद्वारे आश्वासित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, शासनाने वीज दर वाढ मागे घेण्याबाबत तसेच वीज नियामक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार खंडित वीज पुरवठा पूर्ववत सुरु करण्यास होणाऱ्या विलंबाकरीता एकूण किती ग्राहकांना किती रक्कमेचा मोबदला मिळाला आहे, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

महावितरण कंपनीने अंदाजित केलेल्या रुपये ६७६४३ कोटीच्या एकूण महसूली तुटीऐवजी मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी दावा केलेल्या अनुक्रमे १४ % व ११ % वीजदर वाढीऐवजी आर्थिक वर्ष २०२३-२०२४ साठी २.९% व आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी ५.६% वाढ मंजूर केली आहे. वीजदर वाढीची तुलना इतर राज्यांसोबत करतांना वीज खरेदी दरातील भिन्नता, राज्यांचे भौगोलिक क्षेत्र, कृषी ग्राहक संख्या, वेगवेगळया प्रवर्गातील ग्राहक व त्यांच्या वीजवापरातील भिन्नता या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

(२) हे खरे नाही.

मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने शीतगृहांना कृषीजन्य उत्पन्नाकरीता कृषी-अन्य व अन्य उत्पन्नाकरीता औद्योगिक असे वर्गीकरण केले आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ व आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये या दोन्ही वर्गवारीतील ग्राहकांच्या वीजदरात १ % ते ९% पर्यंत वाढ करण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे.

महाकोल्ड स्टोरेज आणि नवी मुंबई असोसिएशन यांनी मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे मध्यावधी आढावा आदेशावर फेरविचार याचिका दाखल केली असून ती न्यायप्रविष्ट आहे.

(४) हे खरे आहे.

(५) राज्य शासनाची भुमिका मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास अवगत करण्यात आली आहे.

(६) मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार ग्राहकांच्या समस्या सोडविण्याबाबत महावितरण प्रयत्नशील आहे.

-----------------

## रायगड जिल्ह्याच्या सागरी किनारपट्टीवरील बंदरे सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने असुरक्षित असल्याबाबत.

**(७) * १९८६७ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, प्रा.राम शिंदे, श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्याच्या २४० किलोमीटरच्या सागरी किनारपट्टीवर रेवदंडा, थेरोंडा, आग्राव, मांडवा, रेवस तसेच मुरूड तालुक्यातील बोर्ली, तारा अशी अनेक नैसर्गिक बंदरे असून, येथे सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने ते असुरक्षित असल्याचे दिनांक ११ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील साखळी बॉम्बस्फोटानंतर नौदलाने केलेल्या सर्वेक्षणात रायगड जिल्ह्यामधील २० बंदरे अतिसंवेदनशील घोषित करण्यात आली असून त्यावेळी नौदलाने या सर्व बंदरांवर कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करतानाच मासेमारी नौकांसह खलाशांची नोंद ठेवण्यासाठी टोकन पध्दत सुरू करण्याचा निर्णय घेतला होता मात्र काही बंदरे वगळता उर्वरित बंदरांवर सुरक्षा व्यवस्थेची कमतरता दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मांडवा, रेवस, अलिबागसह सर्व बंदरे अतिरेक्यांच्या घातपाती कारवाया केल्या जात असूनही २६ /११ च्या हल्ल्यानंतर संभाव्य धोके टाळण्यासाठी गुजरात आणि तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर या बंदरांवर देखील येणाऱ्या मासेमारी नौकांसह खलाशांची नोंद ठेवण्यासाठी नौदल आणि गृह विभागाच्या निर्देशानुसार महाराष्ट्राच्या मत्स्यविकास विभागाने २०१५ मध्ये टोकन पध्दत राबविली असून त्यानुसार २४ तास तीन पाळयांमध्ये सुरक्षारक्षक व पर्यवेक्षक यांची नेमणूक करण्याचा निर्णयही घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, व्यापारासह पर्यटन व ऐतिहासिक स्थळ म्हणून रेवदंड्याची वेगळी ओळख असताना व जिल्ह्याच्या २४० किलोमीटरच्या सागरी किनारपट्टीवर अनेक नैसर्गिक बंदरे असून कुंडलिका, सावित्री, आंबा नद्यांच्या पात्रातील नैसर्गिक बंदरांवर तसेच रायगड जिल्ह्यातील सर्व बंदरांवर सागरी सुरक्षा व्यवस्था तैनात करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

नौदलाच्या सर्वेक्षणात २० बंदरे व लँडींग पॉईंट अतिसंवेदनशील घोषित केलेले असून, सदर बंदरांच्या व लँडींग पॉईंटच्या सुरक्षिततेसाठी मत्स्यव्यवसाय विभागामार्फत सुरक्षा रक्षक नेमण्यात येतात व त्यांची तपासणी ही रायगड पोलीसांमार्फत केली जाते. तसेच पोलीस विभागाकडून नियमितपणे सागरी किनाराभागात वाहन गस्त, पायी गस्त व पेट्रोलींग करण्यात येते.

(३) होय, हे खरे आहे.

(४) रायगड जिल्ह्यातील बंदरे व लँडींग पॉईटची सुरक्षा वाढविण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१. रायगड जिल्ह्यातील संवेदनशील लँडींग पॉईटवर मस्त्यव्यवसाय विभागामार्फत सुरक्षा रक्षक नेमण्यात येतात व त्यांची तपासणी ही रायगड पोलीसांमार्फत केली जाते.

२. रायगड जिल्ह्यातील सर्व संवेदनशील फिश लँडिंग पॉईन्टस/ बंदरे येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत सह आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या देखरेखीखाली सर्व संवेदनशील फिश लँडींग पॉईन्टस/ बंदरे येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची प्रक्रिया चालू आहे.

३. रायगड जिल्ह्यातील ०९ संवेदनशील लँडींग पॉईटवर ४३ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलले आहेत. तसेच सागरी सुरक्षा योजना फेज-३ अंतर्गत ड्रोन व सीसीटीव्हीची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आली आहे.
४. त्याचबरोबर बंदराच्या सुरक्षिततेसाठी पोलीस विभागाकडून नियमितपणे सागरी किनाराभागात वाहन गस्त, पायी गस्त व पेट्रोलींग करण्यात येते.
५. सागरी सुरक्षेकरीता जास्तीत जास्त सागर रक्षक दलाच्या बैठका घेऊन मच्छिमारांना सर्तकतेबाबत सूचना देण्यात येतात. समन्वय समितीच्या दरमहा बैठका आयोजित करण्यात येतात.
६. संवेदनशील लँडींग पॉईटवर सद्य:स्थितीत नेमण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांऐवजी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडील प्रशिक्षीत सुरक्षा रक्षक नेमण्याबाबत मत्स्यव्यवसाय विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
७. भारतीय नौदलातर्फे सन २०१४-१५ मध्ये लँडींग पॉईटचे सर्वेक्षण करण्यात आले होते, तथापि, सदर ९१ संवेदनशील लँडींग पॉईटची पुन:पडताळणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई पोलिसांच्या दैनंदिन कर्तव्याचे तास निश्चित करण्याबाबत.

**(८) * १८९०६ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, प्रा.राम शिंदे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील पोलिसांवर कामाचा अधिक ताण असल्याने गत पाच वर्षांत सरासरी दर दोन दिवसांआड एका पोलिसाचा मृत्यू झाला असून तब्बल ८२१ पोलीस मृत्यूमुखी पडले असल्याची गंभीर बाब माहे मे,२०२३ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईच्या लोकसंख्येच्या तुलनेत मुंबई पोलिसांची संख्या अत्यल्प असल्याने त्यांचे स्वास्थ्य टिकविण्यासाठी पोलिसांना मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्यासह त्यांच्यावरील ताण कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना हाती घेण्याची तसेच, मुंबई पोलीस दलातील महिलांसह पुरुष अंमलदार-अधिकाऱ्यांनाही आठ तास 'ड्युटी' लागू करण्यासह 'ओव्हर टाइम' भत्ता देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.गृह मंत्री, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडे दिनांक ०९ मे, २०२३ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईतील देवनार पोलीस ठाण्यात मागील सात वर्षांपासून सुरू असलेल्या पोलिसांच्या आठ तास ड्युटीला चांगला प्रतिसाद असूनही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या अनावस्थेमुळे ती राज्यातील सर्व पोलीस ठाण्यात पोहोचू शकली नसल्याची बाब माहे मे २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दिल्ली, पंजाब, उत्तर प्रदेश, गुजरात, पश्चिम बंगाल आदी राज्यातही पोलिसांची आठ तास ड्युटी सुरू आहे मात्र मुंबईतील तसेच राज्यातील काही ठिकाणचा अपवाद वगळता इतरत्र आठ तास ड्युटी नसल्याने पोलीस अंमलदार नाराजी व्यक्त करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील पोलिसांचे स्वास्थ्य टिकविण्यासाठी, पोलिसांना मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्यासह त्यांच्यावरील ताण कमी करण्यासाठी मुंबईसह राज्यातील सर्व पोलिसांना आठ तास ड्युटी लागू करण्यासह ‘ओव्हर टाइम’ भत्ता देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. पोलीसांचा मृत्यू कामकाजाच्या अतिताणामुळे झालेला नाही.
(२), (३), (४) व (५) पोलीस शिपाई ते पोलीस उप निरीक्षक या पदापर्यंत अधिकारी/ कर्मचारी हे सतत १० तासांच्या वर कर्तव्यार्थ राहिल्यास त्यांना अतिकालिक भत्ता (आहार भत्ता) प्रतिमाह मासिक वेतनाबरोबर अदा करण्यात येत आहे. सदरहू आहार भत्त्यात वाढ करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन असून याबाबतची अतिरिक्त माहिती पोलीस महासंचालक यांच्याकडून शासनास सादर करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत बृहन्मुंबई आयुक्तालयातंर्गत पोलीस ठाण्यापासून जवळ राहणाऱ्या पोलीस अंमलदारांना ८ तास कर्तव्य १६ तास आराम देण्यात येतो. तसेच पोलीस ठाण्यापासून ५० किमी पेक्षा दुर राहणाऱ्या पोलीस अंमलदारांना १२ तास कर्तव्य २४ तास आराम देण्यात येत आहे. ५५ वर्षांवरील अंमलदार व शारीरिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या अंमलदारांना त्यांच्या विनंतीप्रमाणे ८ तास कर्तव्य व १६ तास आराम किंवा १२ तास कर्तव्य व २४ तास आराम देण्यात येतो. मात्र पोलीस अंमलदारांची मंजूर पदे, रिक्त पदांची संख्या, सण- उत्सव,महत्वाचे बंदोबस्त, मोर्चा-आंदोलन, अधिवेशन, निवडणूका, महत्वाच्या व्यक्तींचे दौरे व दैनंदिन कामकाज इ. बाबी विचारात घेता ८ तास कर्तव्य योजना नियमितपणे राबविणे शक्य होत नाही अशी वस्तुस्थिती आहे. त्याचबरोबर संपूर्ण राज्यात ८ तास कर्तव्य कालावधी लागू करावयाचा झाल्यास फार मोठ्या प्रमाणावर पदनिर्मिती करणे अपरिहार्य आहे व यामुळे शासन तिजोरीवर पडणारा मोठ्या प्रमाणावरील आर्थिक भार विचारात घेऊन याबाबत निर्णय घ्यावा लागेल. पोलीसांवरील कामाचा ताण कमी करण्याच्या दृष्टीकोनातून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली असून नुकतीच राज्यात १४,९५६ पोलीस शिपायांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.

-----------------

## राज्य पोलीस दलातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) * १९१०९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदली व पदोन्नतीबाबत यादी जाहीर करण्यात आली असताना राज्य पोलीस दलातील पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक या पदांच्या पदोन्नती ह्या पोलीस महासंचालक यांचे कार्यालय व मंत्रालयातील गृह विभागाच्या समन्वयाअभावी प्रलंबित असल्याने तसेच पोलीस दलातील पोलीस महासंचालक दर्जाच्या ५ पदांसह महत्वाची अन्य ४२ पदे गेल्या काही महिन्यांपासून रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक कनिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नती व बदल्यांपासून वंचित ठेवण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने राज्य पोलीस दलातील पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक व अन्य कर्मचाऱ्यांना पदोन्नती व बदल्या देऊन सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) माहे फेब्रुवारी, २०२३ व एप्रिल, २०२३ मध्ये निवडश्रेणी ते पोलीस महासंचालक श्रेणींतील एकूण ४२ भा.पो.से. अधिकाऱ्यांना पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे. सध्या पोलीस महासंचालक श्रेणीतील २ पदे रिक्त आहेत.

पोलीस दलांतर्गत पोलीस अंमलदार ते पोलीस निरीक्षक या पदांच्या पदोन्नती, बदल्या व आस्थापनाविषयक बाबींचे अधिकार प्रकरणपरत्वे पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्त व पोलीस महासंचालक यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे पोलीस महासंचालक व मंत्रालय गृह विभागाच्या समन्वयाभावी यासंवर्गातील बदल्या व पदोन्नत्या प्रलंबित आहेत अशी वस्तुस्थिती नाही.

सहायक पोलीस निरीक्षक ते पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्नतीसाठी विभागीय पदोन्नती समितीची बैठक पोलीस महासंचालक यांचे स्तरावर झाली असून निवडसूची तयार करण्यात आली आहे. तथापि, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या न्यायालयीन प्रकरणांतर्गत झालेले विविध आदेश, प्रकरणांची क्लिष्टता, विचारात घेता सद्यःस्थितीत या संवर्गातील पदोन्नत्यांसाठी विलंब होत आहे ही वस्तुस्थिती आहे.

पोलीस उपनिरीक्षकांच्या १११ व ११२ च्या तुकडीतील अधिकाऱ्यांना सन २०२२-२३ च्या निवडसूचीवर पोलीस उप निरीक्षक ते सहायक पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

दिनांक २३/०५/२०२३ च्या आदेशान्वये एकूण ३८५ पोलीस अंमलदार यांना पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

याव्यतिरिक्त ३९५ पोलीस निरीक्षक तर ६३९ सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक यांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. सबब वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक कनिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नती व बदल्यांपासून वंचित ठेवण्यात येते ही वस्तुस्थिती नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाने लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करताना गैरव्यवहार केल्याबाबत

**(१०) * १९९२५ श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामरागड (जि.गडचिरोली) येथे केंद्रवर्ती अर्थसंकल्पीय योजनेंतर्गत शासनाच्या इतर कोणत्याही योजनेत लाभ न मिळणाऱ्या आदिवासी बांधवांना व्यवसायासाठी दुभत्या, दुधाळ गायी घेण्याकरीता थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) माध्यमातून वितरीत केलेल्या अनुदानात गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी भामरागड (जि.गडचिरोली) आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी मा.आदिवासी विकास मंत्री महोदयांकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून, चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम वितरीत करताना गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२) व (३) सन २०२२-२०२३ मध्ये केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत थेट लाभ हस्तांतरण माध्यमातून एकूण २० आदिवासी लाभार्थ्यांना दुधाळ गायी पुरविणे योजनेंतर्गत रुपये १ लाख प्रति लाभार्थी इतके अनुदान देण्याची योजना भामरागड प्रकल्पांतर्गत राबविण्यात आली आहे. सदर प्रकरणी सखोल तपासणी करून सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सुचना आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरगांबाद येथील चिकलठाणा विमानतळ परिसरात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(११)** * **१९२९५ श्री.अंबादास दानवे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दिवसेंदिवस महिलांवरील अत्याचारात वाढ झाली असतानाच औरगांबाद येथील चिकलठाणा विमानतळ परिसरात गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या तीन इसमांनी ३२ वर्षीय विवाहितेवर सामुहिक अत्याचार करुन तिची दगडाने ठेचून क्रुर हत्या केली असल्याचे दिनांक २ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेतील आरोपी व काही गुन्हेगारी प्रवृत्तीचे इसम चिकलठाणा विमानतळ परिसरात गत काही वर्षांपासून महिलांची छेड काढणे तसेच त्यांच्या सोबत गैरकृत्य करणे, असे प्रकार राजरोसपणे करीत असून याबाबत नागरिकांनी स्थानिक पोलीस ठाण्यामध्ये तक्रारी करुनही सदरहू घटनांकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारे पोलीस प्रशासनाने जाणीवपुर्वक दुर्लक्ष केल्याने औरगांबाद येथील केंब्रिज परिसरात एका वैद्यकीय शाखेच्या विद्यार्थीनीवर बलात्कार, एएस क्लब व भांगसीमाता गड परिसरात देखील अशा घटना घडल्या असून काही खटल्यांमध्ये मा.न्यायालयाने पोलिसांवर ताशेरे ओढलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी संबंधित घटनेची चौकशी करण्याबाबत मा.उप मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक १२ एप्रिल, २०२३ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार चिकलठाणा विमानतळ परिसरातील घटनेतील आरोपींवर जलदगती न्यायालयात खटला चालवून कठोरात कठोर शिक्षा होण्यासाठी व नागरिकांनी तक्रारी करुनही त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) एमआयडीसी सिडको पोलीस ठाणे, औरगांबाद येथे ३२ वर्षीय महिलेवर अत्याचार करुन तिचा दगडाने ठेचून खून केल्याप्रकरणी ३ आरोपीविरुध्द गु. र. क्र. १७०/२०२३, भारतीय दंड विधान संहिता कलम, ३०२, ३७६ (ड), ३९७, ३४१, २०१, ३४ अन्वये दिनांक ०३/०४/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील ३ आरोपींस दिनांक ०३/०४/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर आरोपींविरुध्द दोषारोप क्र. ९५/२०२३ अन्वये मा.न्यायालयात दिनांक २६/०६/२०२३ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(२) उक्त घटनेतील आरोपींविरुध्द इतर गुन्हे दाखल आहेत. परंतु, यामध्ये छेडछाड किंवा महिलांवरील अत्याचाराबाबत गुन्हा दाखल नाही.
(३) दौलताबाद पोलीस ठाणे, औरगांबाद येथे भांगसीमाता गड परिसरातील दिनांक ०४/०८/२०२० रोजीच्या घटनेबाबत पिडितेच्या फिर्यादीनुसार दिनांक ०५/०८/२०२० रोजी, गु. र. क्र. १८१/२०२०, भारतीय दंड संहिता कलम ३७६ (ड), ३६५, २३२, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तदनंतर, भांगसीमाता गड, ए. एस. क्लब या परिसरामध्ये महिलांवरील अत्याचाराबाबतची तक्रार संबंधित पोलीस ठाण्यामध्ये दाखल झालेली नाही.
(४) मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांच्या दिनांक १२/०४/२०२३ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत पोलीस आयुक्त, औरगांबाद यांना सूचित करण्यात आले आहे.
(५) सदर प्रकरणी ३ आरोपीविरुध्द गु. र. क्र. १७०/२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर आरोपीस दिनांक ०३/०४/२०२३ रोजी अटक करुन मा.न्यायालयात त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी व हिंगोली जिल्ह्यांमधील पुर्णा नदीवरील चार उच्च पातळी बंधाऱ्यांचे काम पूर्ण करण्याबाबत.

**(१२) * १९०९१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी : तारांकित प्रश्न क्रमांक १५९६३ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी व हिंगोली जिल्ह्यातील पुर्णा नदीवरील सुमारे ५,६०० हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असल्याने त्याकामासाठी १ हजार १६ कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाने माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुर्णा नदीवरील परभणी जिल्ह्यातील ममदापुर तसेच हिंगोली जिल्ह्यातील पोटा, जोडपरळी, व पिंपळगांव कुटे या चारही उच्च पातळी बंधाऱ्यांच्या प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावाची छाननी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांनी केल्यानंतर सदर प्रस्तावास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (MWRAA) यांची मान्यता घेण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रशासकीय प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर प्रकल्पासाठीचे भूसंपादन, सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता घेणे व निविदा प्रक्रिया पूर्ण करुन निधी उपलब्धतेनुसार क्षेत्रिय स्तरावर कामे चालु करण्याचे नियोजन होत असून त्याची सद्यः स्थिती काय आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निधी, भूसंपादन, पाणी वाटप, सर्व बंधाऱ्यांचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे,

पुर्णा नदीवरील प्रस्तावित चार बंधाऱ्याची एकूण सिंचन क्षमता ५५९४ हे. असून प्रस्तावित प्रशासकीय मान्यता किमंत रुपये १०११.७० कोटी आहे.

(२) होय, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (MWRRA) यांची मान्यता घेण्यात आलेली आहे.

(३) व (४) पुर्णा नदीवरील उच्च पातळी बंधाऱ्यांकरीता प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यते बाबत कार्यवाही प्रगतीत असून प्रशासकीय मान्यतेसंदर्भात चार बंधाऱ्यांचे प्रस्ताव नियोजन विभाग व वित्त विभागास सादर करण्यात आलेले होते, सदरील प्रस्तावाबाबत नियोजन विभाग व वित्त विभागामार्फत प्रस्तावाच्या छाननी दरम्यान उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतची पुर्तता करणे प्रगतीपथावर आहे.

या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर भुसंपादन, सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता घेणे व निविदा प्रक्रिया या बाबींची पुर्तता करणे नियोजित आहे.

(५) लागू नाही.

-----------------

## सांबरकुंड (ता.अलिबाग, जि.रायगड) धरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१३) * १९९५९ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील जमीन सिंचनाखाली आणण्याच्या उद्देशाने सांबरकुंड या ठिकाणी धरण बांधण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, १९८२ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात येवून त्यावेळी या धरणाच्या कामाकरीता रूपये ११ कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ४० वर्षांपासून आजमितीपर्यंत या धरणाच्या कामाकरीता जवळपास पाच वेळा मुदतवाढ देवूनही सद्य:स्थितीत सदरहू धरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे तसेच या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या जमीनधारकांना जुन्याच दराने नुकसान भरपाई देण्यात येत असून प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनही अद्याप प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या भूधारकांना बाजारभावानुसार सुधारित वाढीव दराने मोबदला देण्याबाबत, प्रकल्पग्रस्तांचे योग्य ते पुनर्वसन करण्याबाबत तसेच सदरहू धरणाचे काम तातडीने सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशतः खरे आहे.

सांबरकुंड मध्यम प्रकल्पाकरीता २६३.५४०६ हेक्टर वनजमीन आवश्यक आहे. प्रकल्पास आवश्यक वनजमीन हस्तांतरण प्रस्ताव प्रगतीत असून त्यावर केंद्र शासनाची अंतिम मान्यता प्राप्त झाल्यानंतर धरणाचे काम प्राधान्याने हाती घेऊन निधी उपलब्धतेनुसार पुढील तीन वर्षात पूर्ण करण्याचे नियोजीत आहे.

सांबरकुंड मध्यम प्रकल्पाच्या धरण, बुडीत क्षेत्र व इतर कामासाठी लागणाऱ्या १०३.८१ हे. खाजगी जमिनीचा अंतिम निवाडा भूसंपादन कायदा - १८९४ नुसार दिनांक १७/०९/२०११ रोजी जाहीर आहे. परंतु बाधित भूधारकांनी प्रचलित बाजारभाव व शासकीय नियमाप्रमाणे जमिनीचा मोबदला मागितला आहे. त्यानुषंगाने महामंडळाकडून दिनांक १३/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त सानुग्रह अनुदान प्रस्ताव शासनस्तरावर तपासणीत आहे.

सदर प्रकल्पामुळे बाधित जांभुळवाडी, सांबरकुंडवाडी व खैरवाडी यांचे पुनर्वसन मौजे रामराज, ता.अलिबाग मधील राजेवाडी येथे प्रकल्पग्रस्तांचे पसंतीने करण्याचे प्रस्तावित असून त्यानुषंगाने कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निम्न तापी प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करणेबाबत.

**(१४) * १९७२३ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील अमळनेरसह ५ तालुक्यांसाठी महत्त्वाचा असलेला निम्न तापी प्रकल्प गेल्या २५ वर्षांपासून प्रलंबित असल्याने प्रकल्पाचा खर्च अनेक पटीने वाढला असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपूर्ण प्रकल्पामुळे दरवर्षी १० हजार दशलक्ष घनमीटर पाणी वाहून जात असून सदर प्रकल्प अपूर्ण असल्यामुळे ५४ हजार ९३६ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येण्यापासून वंचित राहिले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करून त्यास सुधारित प्रशासकीय मान्यता द्यावी, अशी मागणी जळगाव परिसरातील ग्रामस्थांनी शासनाकडे वेळोवेळी केली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरच्या प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करून सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशतः खरे आहे.

निम्न तापी प्रकल्पाची मूळ प्रशासकीय मान्यता किंमत रुपये १४२.६४ कोटी (दरसुची १९९५-९६) इतकी आहे. निम्न तापी प्रकल्पाचा रुपये ४८९०.७७ कोटीचा (दरसुची २०२२-२३) अद्यावत चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.
(२) अंशत: खरे आहे.

निम्न तापी प्रकल्पाच्या मंजूर तृतीय सुप्रमा अहवालानुसार एकूण नियोजित पाणीवापर ५०२.०९ दलघमी (१७.७३ अघफु) इतका असून, संकल्पित सिंचन क्षमता ५४,९३६ हे. इतकी आहे. सदर प्रकल्प बांधकामाधीन असून, पूर्ण झाल्यानंतर पाणीसाठा व सिंचन क्षमता निर्मिती होणार आहे.
(३) हे खरे आहे.
(४) PMKSY व BJSY या दोन्ही योजनेत समाविष्ट असलेले प्रकल्प वगळून, उर्वरीत प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रुपये १५००० कोटीचे दीर्घ मुदतीचे कर्ज घेण्यास मान्यता प्राप्त झालेली असून, सदर नमूद प्रकल्पांमध्ये निम्न तापी प्रकल्पाचा समावेश करण्यात आलेला आहे. प्रकल्पाचा समावेश केंद्र शासन पुरस्कृत PMKSY-AIBP (२०२१-२६) या योजनेंतर्गत प्रकल्पाचा समावेश करण्यासाठी राज्य वित्त विभागाच्या सहमतीची (SFC) आवश्यकता असून, त्याकरीता सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे. सुप्रमाच्या प्रस्तावाबाबत शासनस्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यात जी एस टी च्या बनावट नोंदणीद्वारे शासनाला कोट्यवधी रुपयांना फसविण्याचे प्रकार वाढत असल्याबाबत.

**(१५)** * **१८८०९ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यामध्ये जीएसटी च्या बनावट नोंदणीद्वारे शासनाला कोट्यवधी रुपयांना फसविण्याचे प्रकार वाढत असून वर्षभरात असे चार प्रकार झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी दिल्लीत सांगलीतील एका अभियंत्याच्या पॅन कार्डचा गैरवापर करुन जीएसटी नोंदणी द्वारे १८ कोटी रूपयांचा बनावट व्यवहार दाखवत शासनाला ३.५० कोटी रुपयांना फसविण्यात आले तसेच समडोळी (ता.मिरज) येथील एका ठेकेदाराची कागदपत्रे वापरून बनावट जीएसटी नोंदणी करत शासनाला कोट्यवधी रुपयांना फसविण्यात आले तसेच जत तालुक्यातील एका मजुराच्या नावावर मेहसाना येथील एका व्यक्तीने बनावट नोंदणी करून ४० लाख रूपयांचा कर चुकविला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) राज्य जीएसटी विभागातर्फे बनावट कागदपत्रांद्वारे जीएसटी नोंदणी घेणाऱ्या व्यापाऱ्यांविरुध्द पडताळणी मोहीम घेण्यात आली आहे. त्यातून सांगली विभागात ०८ व्यापाऱ्यांनी बनावट कागदपत्रांद्वारे नोंदणी केल्याचे आढळून आले आहे.
(२) नवी दिल्लीत सांगलीतील एका अभियंत्याच्या पॅन कार्डचा गैरवापर करून जीएसटी नोंदणीद्वारे १८ कोटींचा बनावट व्यवहार दाखवत शासनाला ३.५० कोटी रुपयांना फसविण्यात आल्याचे प्रकरणी महाराष्ट्र राज्य कर विभाग तसेच केंद्रीय राज्यकर विभाग(सांगली) यांनी याप्रकरणी कार्यवाही केलेली नाही, त्यामुळे या प्रकरणाच्या सत्यतेबाबत माहिती उपलब्ध नाही.

समडोळी (ता.मिरज) येथील एका ठेकेदाराने बनावट कागदपत्रे सादर करून जीएसटी नोंदणी दाखला घेतल्याचे आढळून आले आहे.

जत तालुक्यातील एका मजुराच्या नावावर मेहसाणा येथील एका व्यक्तीने बनावट नोंदणी करून ४० लाखांचा कर चुकविला असल्याचे प्रकरणी महाराष्ट्र राज्य कर विभाग तसेच केंद्रीय राज्यकर विभाग(सांगली) यांनी याप्रकरणी कार्यवाही केलेली नाही, त्यामुळे या प्रकरणाच्या सत्यतेबाबत माहिती उपलब्ध नाही.
(३) समडोळी (ता.मिरज) येथील एका ठेकेदाराने बनावट कागदपत्रे सादर करून जीएसटी नोंदणी दाखला घेतल्याचे आढळून आले आहे. उपरोक्त प्रकरणामध्ये केंद्रीय वस्तू व सेवाकर विभागाने अन्वेषणाची कार्यवाही केली असून राज्य कर विभागाने सदर व्यापाऱ्याचा ६.१५ कोटी एवढा Input Tax Credit अवरोधित (Block) केला असून सदर व्यापाऱ्याचा नोंदणी दाखला पूर्वलक्षीप्रभावाने रद्द करण्यात आला आहे.

बनावट कागदपत्रांद्वारे नोंदणी केलेल्या इतर ७ व्यापाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली असून सर्वांचे नोंदणी दाखले पूर्वलक्षीप्रभावाने रद्द करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील रिक्त पदे भरणेबाबत

**(१६) * १९३४८ श्री.आमश्या पाडवी, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.जयंत पाटील, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील मंजूर एकूण १६४४३ पदांपैकी सुमारे ६६९० म्हणजेच ४१% एवढी पदे रिक्त आहेत, तसेच आदिवासी विकास विभागातील एकूण मंजूर २११५४ पदांपैकी सुमारे ६२१३ म्हणजेच २९.३७% एवढी पदे गेल्या अनेक दिवसांपासून रिक्त असून, सदर पदे भरण्याकरीता मा.लोकप्रतिनिधी व विविध सामाजिक संघटनानी वेळोवेळी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांची एकूण ९०४६ पदे मंजूर असून त्यापैकी सुमारे ३२४७ म्हणजेच ३२% एवढी पदे रिक्त आहेत तर वर्ग ४ ची सुमारे ३४४३ पदे रिक्त असून त्यापैकी २६१२ पदे ही स्वयंपाकी यांची आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय आदिवासी आश्रम शाळा व आदिवासी विकास विभागात एवढ्या मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असण्याची व ती न भरण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, 'अधीक्षक' या संवर्गातील पदसंख्या रिक्त असून वसतिगृहास कायमस्वरूपी अधीक्षक नसल्याने विद्यार्थी मृत्युंचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रिक्त पदे भरून आदिवासी विभागाच्या अनेक कल्याणकारी योजनांचा लाभ आदिवासी बांधवांपर्यंत पोहचविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२) व (३) शासकीय आदिवासी आश्रशाळेचा एकूण १०४४३ पदांचा सुधारीत आकृतिबंध मंजूर आहे त्यानुसार शिक्षक, मुख्याध्यापक व शिक्षकेतर यांचे एकूण ३१९१ पदे रिक्त आहे म्हणजेच एकूण रिक्त पदांची टक्केवारी ३०.५५ % इतकी आहे.

आदिवासी विकास विभागाच्या सुधारीत आकृतीबंधानुसार एकूण १४३५९ पदे मंजूर आहे व बाह्यस्त्रोताद्वारे (Outsourcing) एकूण ६०८८ पदे मंजूर आहे. वर्ग ४ ची एकूण १५५१ पदे मंजूर असून सर्व पदे भरलेली आहेत, त्यापैकी स्वयंपाकी १०५० पदे भरलेली आहेत.

शासकीय आदिवासी आश्रमशाळेत आदिवासी विकास विभागाच्या दिनांक ०६/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये रोजंदारी कर्मचारी यांना शासन सेवेत नियमित करण्याची कार्यवाही सुरु आहे तसेच आयबीपीएस या संस्थेमार्फत गट-क पदांची व महाराष्ट लोकसेवा आयोगामार्फत गट-क संवर्गातील कनिष्ठ लिपिक पदांची पदभरतीची प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) हे, खरे नाही,

अधीक्षक (पुरुष) संवर्गात एकूण ४९९ पदे मंजूर असून त्यापैकी ४७३ पदे भरलेली आहे व अधीक्षक (महिला) संवर्गात एकूण ४९९ पदे मंजूर असून त्यापैकी ४३६ पदे भरलेली आहे. ज्या वसतिगृहामध्ये अधीक्षक पद रिक्त आहे त्या रिक्त पदाचा अतिरीक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्याकडे दिला जातो त्यामूळे कायमस्वरुपी अधीक्षक नसल्यास विद्यार्थी मुत्यूचे प्रमाण वाढले अशी वस्तुस्थिती नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## राज्यातील सहा मध्यम सिंचन प्रकल्प २५ वर्षानंतरही अपूर्ण असल्याबाबत

**(१७) * १९२०७ श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक १७०४२ ला दिनांक १० मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ८५ कोटी रुपये किमंतीचे सहा मध्यम सिंचन प्रकल्प २५ वर्षानंतरही अपूर्ण असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आंधळी, पिंपळगांव, पुर्णा, हरणघाट, सोंड्याटोला, वाघोलीबुटी हे मध्यम सिंचन प्रकल्प प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असून जलसंपदा विभागाने प्रकल्पासाठी पाण्याच्या उपलब्धतेचा विचार न करता तसेच जल आयोगाची मंजुरी न घेताच प्रकल्पाची उभारणी सुरु केली, प्रकल्पाच्या आराखड्यातील बदल, पुनर्वसनाचे प्रश्न आणि त्याकरीता वारंवार घ्यावी लागणारी सुधारित प्रशासकीय मान्यता यामुळे या प्रकल्पांचे काम मागील २० ते २५ वर्षांपासून प्रलबिंत असलेल्या नागरिकांची प्रामुख्याने शेतकऱ्यांची पाण्याअभावी गैरसोय होत आहे हे लक्षात घेता त्वरीत प्रलंबित प्रकल्पाचे काम पूर्ण होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

भारताचे नियंत्रक व लेखापरीक्षक यांचा भुपृष्ठ सिंचनातील परिणामावर निष्पादन लेखा परिक्षण अहवाल दिनांक ३० डिंसेबर, २०२२ रोजी विधानमंडळात सादर करण्यात आला होता.सदर अहवालात पुढीलप्रमाणे नमूद आहे:-

| | |
|---|---|
| पूर्ण झालेले प्रकल्प | ०४ प्रकल्प<br>आंधळी (सातारा), हरणघाट (चंद्रपूर), सोंड्याटोला (भंडारा) आणि वाघोलीबुटी (चंद्रपूर) |
| प्रगतीपथावर असलेले प्रकल्प | ०२ प्रकल्प<br>(पिंपळगांव (सोलापूर),पूर्णा (अमरावती) |

(२) हे अंशत: खरे आहे.

१) पुर्णा मध्यम प्रकल्प, ता.चांदुर बाजार, जि.अमरावती
मुळ प्रशासकीय मान्यता - दिनांक दिनांक ०६/०७/१९९२
प्रकल्पाची घळभरणी -सन २००७
सिंचन क्षेत्र - ७५३० हेक्टर
निर्मित सिंचन क्षेत्र -५४१७ हेक्टर

पाणी उपलब्धता प्रमाणपत्र- पुर्णा प्रकल्पास मूळ प्र.मा.ही सन १९९२ मधील नियोजन व जलविज्ञान कार्यालय अस्तीत्वात येण्यापुर्वीची असल्याने पाणी उपलब्धता प्रमाणपत्र घेतलेले नाही. प्रकल्पाच्या पाणी वापरास शासन निर्णय:- पाफेनि-२०२० / प्र.क्र. १२०/२० / मध्यम प्रकल्प दि १६/०३/२०२१ नुसार मान्यता प्राप्त झालेली आहे.

सुप्रमा - प्रकल्पाचा रुपये ३६८.६३ कोटी किमंतीचा चतुर्थ सुप्रमा दिनांक ०६/०८/२०२१ ला मंजूर आहे.

सद्य:स्थिती :- सदर प्रस्तावात नव्याने गणोजा बेलोरा ठिबक सिंचन योजना प्रस्तावित केलेली आहे. प्रकल्पावर नव्याने गणोजा बेलोरा ठिबक सिंचन योजनेंतर्गत २०९० हेक्टर क्षेत्रावर सिंचन निर्मितीचे काम प्रगतीपथावर आहे.

२) वाघोली बुटी उपसा सिंचन योजना-
मुळ प्रशासकीय मान्यता - दिनांक १०/११/१९९३, (रूपये ९५० लक्ष)
प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण-सन २००६
सिंचन क्षेत्र - ४५४२ हेक्टर
निर्मित सिंचन क्षेत्र - २२४६ हेक्टर

सुप्रमा - तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता रुपये ५३२२.०० लक्ष किंमतीस दिनांक ०५/०३/२०१८ (दरसुची वर्ष २०१६-१७) अन्वये प्राप्त आहे.

सद्य:स्थिती :- योजनेचे काम पूर्ण झाले असून प्रत्यक्ष सिंचन सिंचन व्यवस्थापन विभागामार्फत सन २००६ पासून सूरु आहे.

३) सोंड्याटोला उपसा सिंचन योजना :- या योजनेचे सर्व काम पूर्ण झाले असून या योजनेची ११०१० हे. संपूर्ण सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

४) हरणघाट उपसा सिंचन योजना :-मुळ प्रशासकीय मान्यता - दिनांक दिनांक ०८/०२/१९९६ (रुपये १२.१८ कोटी)
सिंचन क्षेत्र - ५८४२ हेक्टर
निर्मित सिंचन क्षेत्र - ४८२० हेक्टर
सुप्रमा - दिनांक ०७/०१/२००२ ला रुपये ४९.२० कोटी इतक्या किंमतीची प्रथम सुप्रमा प्राप्त झाली आहे
योजना कार्यान्वित सन २००८-०९
सद्य:स्थिती :- योजनेचे काम पूर्ण असून सन २००८-०९ पासून योजना कार्यान्वित होऊन प्रत्यक्ष सिंचन सुरु आहे.

५) आंधळी (सातारा) मध्यम प्रकल्प :-मुळ प्रशासकीय मान्यता - दिनांक १४/०७/१९५६
प्रकल्प पूर्ण आहे.
सिंचन क्षेत्र - २३२२ हेक्टर
निर्मित सिंचन क्षेत्र - २२०९ हेक्टर
सुप्रमा -२६/०४/१९७७
सद्य:स्थिती :- प्रकल्पाच्या उर्वरित कालव्याची व वितरण व्यवस्थेची कामे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या विरोधामुळे व झालेल्या नागरीकरणामुळे अपूर्ण आहे.

६) पिंपळगांव ढाळे (सोलापूर) :-मुळ प्रशासकीय मान्यता - सन १९८५ (रुपये ४.३० कोटी)
सिंचन क्षेत्र - ३३८४ हेक्टर
निर्मित सिंचन क्षेत्र -१९१० हेक्टर
चतुर्थ सुप्रमा - प्रकल्पाची कालवा व वितरिकेची कामे पूर्ण करण्यासाठी रुपये १४३.८५ कोटी किमतीचा चतुर्थ सुप्रमा प्रस्तावास मंजूरी देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. सदर मंजूरी प्राप्त झाल्यानंतर कालव्याचे उर्वरित कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सुक्ष्म, लघु उद्योग आणि लेबर चार्जेसवर काम करणाऱ्या उद्योगांना जीएसटी व ग्रामपंचायतीच्या फाळा (कर) वसूलीमध्ये सवलत देण्याबाबत.

**(१८) * १९७१५ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुक्ष्म, लघु उद्योग आणि लेबर चार्जेसवर काम करणाऱ्या उद्योगांना औद्योगिक विकास महामंडळाकडून त्यांना देण्यात न येणाऱ्या सेवांचा सेवा कर, पाणी कर आणि संबंधित ग्रामपंचायतींचा फाळा (कर) वसूल करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या व्यतिरिक्त उक्त उद्योजकांना १२ ते १८ टक्के जीएसटी भरावा लागत असल्यामुळे अनेक सुक्ष्म व लघुउद्योग आता आपला जीएसटी नंबर रद्द करुन घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर शासनाने निर्णय घेवून या उद्योगांसाठी त्यांना भराव्या लागणाऱ्या जीएसटीत सवलत मिळावी याबाबत केंद्र शासनाकडे कोणता पाठपुरावा केला आहे, वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, त्याशिवाय फाळा (कर) वसूली बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय क्र व्हिपीएम/प्र क्र 189/परां-4, दिनांक 13.09.2019 नुसार ग्रामपंचायतीने आकारणी केलेल्या मालमत्ता कराची वसुली महामंडळा मार्फत करण्यात येते व 50% रक्कम ग्रामपंचायतीला देवून उर्वरीत 50% रक्कमेचा वापर औद्योगिक क्षेत्रात उद्योजकांना सेवा पुरविण्याकरीता करण्यात येतो.

(२) हे खरे नाही.

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

(५) लागू नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यात बंधाऱ्यातील कमी अंतरामुळे अशुध्द व अपुरा पाणीपुरवठा होत असल्याबाबत.

**(१९) * १८८५५ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील कृष्णा नदीवरील डिग्रज बंधारा ते आयर्विन पूल बंधारा या दरम्यान असलेल्या कमी अंतरामुळे (केवळ ६१ किमी) सांगली जिल्ह्यात अशुध्द पाणीपुरवठा होत असल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शास्त्रीयदृष्टया हे अंतर चुकीच्या पध्दतीने वापरात आणल्यामुळे तसेच डिग्रज बंधारा ते आयर्विन पूल बंधारा यामध्ये नदीपात्रात मोठमोठे डोह असून डिग्रज नदीपात्रात मात्र कोणताही डोह नसल्याचे व त्यामुळे सांगली जिल्ह्यात अशुध्द पाणीपुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने त्या सर्वप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तसेच नदीपात्रातील स्तोत्र बदलून थेट चांदोली धरणातून नैसर्गिक उताराने शुध्दपाणी सांगलीपर्यंत घेण्याची योजना राबविण्याबाबत सेवानिवृत्त जलसंपदा अभियंता संघटनेकडून शासनास सादर केलेल्या प्रस्तावा प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

सांगली जिल्ह्यातील कृष्णा नदीवरील डिग्रज बंधारा ते आयर्विन पूल बंधारा हे अंतर ६१ कि.मी. नसून प्रत्यक्षात ५ कि.मी. इतके आहे. सांगली जिल्ह्यात अंकलीपुलाजवळ कृष्णा नदी पात्रामध्ये दिनांक १० मार्च, २०२३ रोजी औद्योगिक सांडपाणी विना प्रक्रिया नदीत सोडल्यामुळे मोठ्या प्रमाणात मासे मृत झाल्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त झाल्या होत्या.
(२) कृष्णा नदीवरील साखळी बंधाऱ्यांचे बांधकाम करताना खालील (D/S) बंधाऱ्याचा फुगवटा (FSL) हा वरील बाजुच्या (U/S) बंधाऱ्याचे तळपातळी (Sill Level) पर्यंत येईल अशा पध्दतीने बांधकाम केलेले आहे. शास्त्रीयदृष्ट्या हे अंतर बरोबर आहे. तथापि, डिग्रज नदी पात्रात डोह नसल्याने सांगली जिल्हयांत अशुध्द पाणीपुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे नाही.
(३) सांगली व कुपवाड शहरासाठी कृष्णा नदीचे स्त्रोत बदलून चांदोली धरणातून नैसर्गिक उताराने शुध्द पाणी सांगली पर्यंत घेण्याची योजना राबविण्याबाबत सेवानिवृत्त जलसंपदा संघटनाकडून दिनांक ३/१०/२०२२ रोजी मागणी करण्यात आली होती. त्यास अनुसरुन सांगली व कुपवाड शहरासाठी अमृत २.० योजनेंतर्गत वारणा नदी उदभव समडोळी येथे जॅकवेल बांधून शहरासाठी शुध्द पाणीपुरवठा करणेबाबतचा ठराव मा.महासभा ठराव क्र.३३६, दिनांक १९/१०/२०२२ रोजी पारीत झाला आहे. त्याअनुषंगाने योजनेची अंदाजपत्रके व आराखडे तयार करणेचे काम सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रकाशा व सारंगखेडा (ता.शहादा, जि.नंदुरबार) येथील तापी नदीवरील बॅरेजच्या दरवाजांची दुरुस्ती करणेबाबत

**(२०) * १९२७७ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रकाशा व सारंगखेडा (ता.शहादा,जि.नंदुरबार) येथील तापी नदीवरील बॅरेजच्या लोखंडी दरवाजांना गंज चढल्याने गत ५-६ वर्षांपासून दरवाजांना गळती लागली असून पाणी वाया जात असल्याने बॅरेजच्या दरवाजांची दुरुस्ती होणे गरजेचे आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी पाणी वाया जात असल्याने बॅरेजच्या दरवाजांची दुरुस्ती होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

प्रकाशा व सारंगखेडा (ता.शहादा, जि.नंदुरबार) येथील तापी नदीवरील बॅरेजेसच्या काही लोखंडी दरवाजांना गंज चढलेला आहे. तथापि, त्यामुळे सदर बॅरेजेसच्या दरवाज्यांमधून कोणतीही गळती नाही व पाणी वाया जात नाही. तथापि, सदर बॅरेजेसच्या दरवाज्यांची दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

(२) अंशत: खरे आहे.

१) सारंगखेडा बॅरेजच्या द्वार दुरुस्तीच्या अनुषंगाने सारंगखेडा बॅरेजचा समावेश धरण पुनर्स्थापना व सुधारणा प्रकल्प (DRIP) टप्पा २ अंतर्गत करण्याचे प्रस्तावित असून धरण सुरक्षा पुनर्विलोकन समिती (DSRP) यांनी सुचविलेल्या शिफारशीनुसार आवश्यक कामांची अंदाजपत्रके बनविण्याचे काम क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रगतीत आहे.

२) प्रकाशा बॅरेजमध्यमप्रकल्पाच्या दरवाज्यांनाकाहीप्रमाणातगंज चढलाअसून त्याच्यालोखंडी भागांचेरंगकामकरणेआवश्यक आहे.त्यानूसारत्यावरयांत्रिकीविभागाकडूनरंगकामकरण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरात स्मार्ट सिटी अंतर्गत लावलेले सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बंद असल्याबाबत.

**(२१) * १९३१२ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात स्मार्ट सिटी अंतर्गत जवळपास ३८५६ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे संपूर्ण शहरात लावण्यात आले असून, शहरात होत असलेल्या गुन्हेगारीवर आळा बसावा व झालेल्या गुन्हयांचा तपास करता यावा तसेच शहरातील कायदा व सुव्यवस्था सुस्थितीत ठेवण्यासाठी या सी.सी.टी.व्ही. कॅमेरांचा महत्वपूर्ण उपयोग होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात लावलेल्या सी.सी.टी.व्ही.कॅमेरांपैकी जवळपास ३० टक्के कॅमेरे बंद पडलेले असून, यातील बहुतांश कॅमेरे परिमंडळ विभाग-५ अंतर्गत येत असलेल्या पोलीस स्टेशन क्षेत्रामधील आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहरात सुरू असलेल्या विकास कामांमुळे कॅमेरे बंद पडलेले असून यावर कोणतीही उपाययोजना पोलीस विभागाने अद्यापही केलेली दिसून येत नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर शहरातील सी.सी.टी.व्ही. कॅमेरे सुरू करण्याबाबत तसेच बंद कॅमेऱ्यांबाबत संबंधित कंत्राटदारावर गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नागपूर शहरात स्मार्ट सिटी अंतर्गत जवळपास 3856 सी.सी.टी.व्ही. कॅमेरे संपूर्ण शहरात लावण्यात आलेले आहेत. यापैकी विविध विभागाचे विकास कामांमुळे बाधित झाल्यामुळे एकूण 391 सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बंद आहे. जे एकूण कॅमेरांच्या 10.17 टक्के आहे. यापैकी एकूण 245 कॅमेरे हे परिमंडळ विभाग 5 अंतर्गत येत असलेल्या पोलीस स्टेशन क्षेत्रातील आहे.

(3) व (4) नागपूर शहरात सुरु असलेल्या विकास कामामुळे बंद पडलेल्या कॅमेरा संबंधी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कमेटी (पी.एम.सी.) मध्ये पोलीस आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 16/5/2023 रोजी संबंधित विभाग प्रमुखांची स्मार्ट सिटी कंत्राटदारांची (एल अँड टी) व स्मार्ट सिटी विभागाची बैठक घेण्यात आली होती. संबंधित विभागाच्या पदाधिकाऱ्यांशी पोलीस उप-आयुक्त, वाहतूक यांनी संपर्क करुन व पाठपुरावा करुन ज्या-ज्या ठिकाणी विकासकामे पूर्ण झालेले आहे. तेथील सी.सी.टी.व्ही. कॅमेरे सुरु करण्यात आलेले आहेत.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुण्यातील पिंपरी पोलीस ठाण्याच्या वसाहतीमधील इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(२२)** * **१८९७४ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील पिंपरी पोलीस ठाण्याच्या वसाहतीमधील इमारतीची दुरवस्था झाल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पोलीस वसाहतीमधील जीर्ण झालेल्या इमारतीमध्ये अनेक कुटुंबे जीव मुठीत घेऊन वास्तव्यास असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील पोलीस वसाहतीमध्ये ८०९ घरे असून त्यापैकी पिंपरी-चिंचवड शहरात पिंपरी येथे १०२, भोसरीतील इंद्रायणीनगर येथे १८४, तर वाकड येथील कावेरीनगर येथे ५२३ घरे पोलिसांसाठी आहेत मात्र ती जीर्ण होऊन त्याची पडझड झाली असल्यामुळे पोलीस या वसाहतीत वास्तव्यास नसल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोलीस वसाहतीच्या नुतनीकरणाकरीता निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय. सदरहू शासकीय निवासस्थाने गतकालीन ४० वर्षापेक्षा अधिक कालावधीची असल्याने सदरहू इमारतीची काही प्रमाणात दुरावस्था झालेली आहे. तसेच, स्ट्रक्चरल ऑडीट सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आले असता, सदर शासकीय निवासी इमारती वापरण्यास अयोग्य व धोकादायक असलेबाबत कळविले आहे.
(२) पिंपरी पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील शासकीय इमारती वापरण्यास अयोग्य व धोकादायक असलेबाबत सार्वजनीक बांधकाम विभागाने लेखी स्वरुपात कळविले आहे. सदरहू इमारती रिक्त करुन घेण्यात आल्या असून सध्य :स्थितीत या इमारतीमध्ये शासकीय कर्मचारी वास्तव्यास नाहीत.
(३) पिंपरी पोलीस वसाहत, इंद्रायणीनगर पोलीस वसाहत, कावेरीनगर पोलीस वसाहत येथील सर्वच शासकीय इमारती वापरण्यास अयोग्य आणि धोकादायक स्थितीत नाहीत. तथापि, वसाहतीमधील सुस्थितीतील व वापरण्यास योग्य असलेल्या इमारतीत शासकीय कर्मचारी वास्तव्यास आहेत.

(४) पोलीस आयुक्तालयाच्या अधिनस्त असलेल्या नादुरुस्त शासकीय निवासी इमारतींच्या दुरुस्ती देखभालीकरीता प्रस्ताव शासन स्तरावर सादर करण्यात आले आहे. तसेच, जुन्या कालावधीतील व दुरुस्त न करता येण्याजोग्या धोकादायक इमारतींच्या जागी नव्याने इमारती उभारण्याबाबत जिल्हा नियोजन समिती, पुणे व पोलीस गृहनिर्माण महामंडळ यांचेकडे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकडून सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे रणसिंगवाडी व वेटणे (ता.खटाव, जि.सातारा) या दोन गावांना जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेंतर्गत पाणी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२३) * २०००६ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे रणसिंगवाडी व वेटणे (ता.खटाव,जि.सातारा) या दोन्ही गावांतील विंधन विहिरींमधील पाणी जिहे कठापूर उपसा सिंचन योजने अतंर्गत आंधळी बोगद्यामध्ये उतरत असल्याने शेतकऱ्यांच्या विहिरी कोरड्या पडल्या असून दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तेथील दुष्काळी ९ परिस्थितीबाबत जलसंपदा विभागाचे अधिकारी व दोन्ही गावचे ग्रामस्थ यांचेमध्ये वारंवार बैठका घेण्यात येऊन त्यामध्ये वेटणे बोगद्याचा एअरव्हेन्ट आहे त्याठिकाणी एक मिटर उंचीचे कायमस्वरुपी व मजबूत गेट बसविणे व त्यानंतर नेर धरण ते वेटणे कायमस्वरुपी पाणी उपलब्ध होण्याच्यादृष्टीने कार्यवाही करणे, वेटणे हद्दीतील बोअरवेल अधिकृत करुन देणे, नेर उपसासिंचन योजना टप्पा-२ चालू करणे तसेच कोल्हापूर बंधारे भरुन देणे इत्यादीबाबतचे निर्णय घेण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच उक्त निर्णयाच्या अनुषंगाने मौजे वेटणे व रणसिंगवाडी या गावांना जिहे कठापूर या उपसासिंचन योजनेंतर्गत पाणी उपलब्ध होण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे रणसिंगवाडी व वेटणे ता.खटाव या गावातील विंधन विहिरीचे पाणी जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेंतर्गत आंधळी बोगद्यामध्ये उतरत असल्याने विहिरी कोरड्या पडल्याबाबतची निवेदने क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झाली आहेत. तथापी वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, सातारा यांचे दिनांक ५/०७/२०२३ रोजीच्या अहवालानुसार आंधळी बोगद्यामुळे विंधन विहीरीतून पाणी खाली जाणे शक्य वाटत नाही, असे नमूद केले आहे.
(२) अंशत: खरे आहे.

गुरुवर्य कै. लक्ष्मणरावजी इनामदार उपसा सिंचन योजना (जिहे कठापूर) जि.सातारा या योजनेचा आंधळी बोगदा हा वेटणे व रणसिंगवाडी या गावाचे खालून जात आहे. संबंधित ग्रामस्थांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करणेसाठी व बोगद्याचे काम पूर्ण करणेसाठी दोन्ही गावाच्या ग्रामस्थांसमवेत वेळोवेळी बैठका झाल्या आहेत. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, सातारा यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १५ मे, २०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

मौजे वेटणे व मौजे रणसिंगवाडी गावांचे प्रकल्पाच्या लाभक्षेत्राबाहेरील क्षेत्राचा समावेश व त्यासाठी लागणारे अतिरिक्त पाणी देण्यासाठी कृष्णा प्रकल्पाचे फेर नियोजन तयार करण्यात आले असून ते महामंडळाचे पत्र दिनांक ०२/०६/२०२३ नुसार शासनास सादर करण्यात आले आहे. हे फेर नियोजन मंजूर झाल्यानंतर याबाबतची पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.

(३) शासन पत्र दिनांक २८/०६/२०२३ अन्वये कृष्णा खोऱ्यातील सर्व प्रकल्पांचे कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयाच्या अनुषंगाने फेर जलनियोजन सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या विविध विभागांकडून करण्यात आलेली विकास कामे निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(२४) * २००६५ श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या विविध विभागांकडून करण्यात आलेली विकासकामे तसेच शासकीय योजनांविषयक कामाच्या प्रतीपूर्तीची देयके कोषागार कार्यालयामार्फत अदा केली जात असून गेल्या अनेक दिवसांपासून शासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध न झाल्याने कोषागार कार्यालयाकडून देयके अदा केली जात नसल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,शासनाकडून निधी न मिळाल्यामुळे पुणे जिल्ह्यातील शासकीय कोषागारात हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेची तर राज्यभरातील कोषागारात १ लाख ७ हजार कोटी रुपये इतक्या रकमेची देयके थकीत असल्याचे दिनांक २० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासंदर्भात कामे केलेल्या कंत्राटदारांनी, कामांची देयके तातडीने मिळावीत म्हणून मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री पुणे जिल्हा, मा.विरोधी पक्षनेते (विधानसभा), तसेच जिल्हाधिकारी, पुणे व जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे यांना निवेदन देऊन तशी मागणी केली असल्याचेही त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, शासनस्तरावर प्रलंबित असलेली थकीत देयके अदा करण्याबाबत शासनाने तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) नाही.

(२) नाही.

(३) या अनुषंगाने पत्रव्यवहार आढळून येत नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) मधील जेएनपीएच्या सहा खाजगी बंदरातून रक्तचंदन, घातक शस्त्रे व इतर वस्तूंची तस्करी होत असल्याबाबत.

**(२५) * २०२०६ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) मधील जेएनपीएच्या सहा खाजगी बंदरातून दररोज १५ हजारांपेक्षा अधिक कंटेनर हाताळले जात असून त्यांची तपासणी केली असता त्यातून हजारो कोटी रूपयाचे शेकडो टन वजनांचे रक्तचंदन, घातक शस्त्रे व इतर वस्तूंची ही तस्करी करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, जेएनपीए बंदर परिसरात तस्करांच्या टोळया सक्रिय असल्याने याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, उक्त तस्करी रोखण्याच्या दृष्टीने तसेच तस्करी करण्यास मदत करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) उरण (जि.रायगड) मधील जेएनपीएच्या सहा खाजगी बंदरातून रक्तचंदन, घातक शस्त्रे व इतर वस्तूंची तस्करी होत असल्याबाबत तक्रार पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई यांच्याकडे प्राप्त झाल्याचे दिसून आले नाही.

तथापि, भविष्यात तक्रार प्राप्त झाल्यास प्रचलित कायद्यांन्वये कायदेशीर कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोंडार हवेली (जि.नांदेड) गावातील दलित समाजातील तरुणाच्या हत्येची चौकशी करण्याबाबत

**(२६) * २०४४५ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोंडार हवेली (जि.नांदेड) गावातील दलित समाजातील अक्षय भालेराव याची काही तरुणांनी धारदार शस्त्रांनी निर्घृण हत्या केल्याची घटना दिनांक १ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोंडार हवेली गावामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्याकरीता काही व्यक्तींचा विरोध असताना, अक्षय भालेराव या तरुणाने पोलिसांची परवानगी घेवून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती गावात साजरी केली या रागातून सदर हत्या घडल्याचा आरोप त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी विशेष पोलीस निरीक्षक नेमून अक्षय भालेराव हत्या प्रकरणाचा तपास करुन, सदर प्रकरणी दोषी आढळलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

बोंडार हवेली गावामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्याकरीता अध्यक्ष, सार्वजनिक भिम जयंती मंडळ यांनी दिनांक २५/४/२०२३ रोजी पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथून दिनांक २९/०४/२०२३ रोजी मिरवणूक काढण्यासाठी परवानगी घेतली होती.

(३) सदर घटनेनूसार पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण, नांदेड येथे गु.र.न. ३९२/२०२३ कलम ३०२, ३०७, ३२४, ३२३, ११४, ११५, ३३६, २९४, १४३, १४७, १४८, १४९, ५०४ भा.द.वि. सहकलम ३ (१)(r)(s), ३ (२)(v), ३ (२)(va) अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती प्रतिबंधक कायदा सहकलम ४/२५, ४/२७ शस्त्र अधिनियम सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा प्रमाणे दिनांक ०२/०६/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील ९ आरोपींना अटक करण्यात आले असून आरोपींविरूध्द दोषारोप दाखल करण्याची कार्यवाही सूरू आहे. तसेच दाखल गुन्हयाचा तपास उप विभागीय पोलीस अधिकारी, उप विभाग नांदेड (शहर) चार्ज उप विभाग इतवारा यांच्यामार्फत केला जात असून तपास सूरू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबईतील संरक्षण आस्थापनांजवळील बांधकामांना सवलत देणारे परिपत्रक स्थगित केल्याबाबत

**(२७) * १९५९८ श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील,श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, अ‍ॅड. निरंजन डावखरे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील संरक्षण आस्थापनांपासून ५० ते १०० मीटर पर्यंतच्या बांधकामांना सवलत देणारे परिपत्रक संरक्षण मंत्रालयाने स्थगित केल्यामुळे मुंबईतील पुनर्विकास प्रकल्प ठप्प झाले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास डिसेंबर, २०२२ च्या परिपत्रकानुसार महानगरपालिका म्हाडा आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने रखडलेल्या अनेक प्रकल्पांच्या परवानग्या जारी करण्यास सुरुवात केली होती मात्र त्यानंतर अचानक स्थगितेचे परिपत्रक जारी झाल्याने हे प्रकल्प पुन्हा एकदा धोक्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या प्रकल्पाचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या संरक्षण मंत्रालयाने दिनांक २३/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये इमारत बांधकामासाठी ना-हरकत प्रमाणपत्र जारी करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे सुधारित केली होती. त्यानुसार काही विनिर्दीष्ट मालमत्तांना संरक्षण आस्थापनेच्या संरक्षणाच्या बाह्य भिंतीपासून ५० मिटर अंतरापर्यंत सुरक्षा निर्बंध लागू करण्यात आले होते.

तद्नंतर संरक्षण मंत्रालयाच्या दिनांक २३/०२/२०२३ च्या पत्रान्वये दिनांक २३/१२/२०२२ रोजीच्या पत्रास पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील विकासकाने सामंजस्य करारावर बनावट स्वाक्षरी करून कोट्यवधी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(२८) * १८९२९ श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १७८९३ ला दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विकासक श्री.मोहम्मद लोखंडवाला यांनी सामंजस्य करारावर साबिर रशिद यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करुन फैजल रशिद यांचे संमतीशिवाय मिनर्व्हा प्रकल्प, महालक्ष्मी येथील त्यांच्या मालकीचे १८ कोटी रूपये किंमतीचे दोन फ्लॅट आयडीबीआय व एडलवाईज कंपनीकडे कर्जाच्या बदल्यात गहाण ठेवून फसवणूक केल्याप्रकरणी वरळी पोलीस ठाणे, मुंबई यांनी सदर तक्रार अर्ज पुढील चौकशीसाठी दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडे वर्ग केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांनी तपास पूर्ण केला आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाच्या तपासात काय आढळून आले आहे, तदनुषंगाने सदर प्रकरणातील दोषी विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय.

सदर प्रकरणी चौकशीअंती गैरअर्जदारांविरोधात कोणताही गुन्हा निष्पन्न होत नसल्याने सदर अर्जाची चौकशी बंद करण्यात आली असून त्याबाबत अर्जदार यांना दिनांक १३/०६/२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकरी कृषीपंप वीज जोडणीच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(२९) * १९३६६ श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १५२४७ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीज खातेदार शेतकऱ्यांची संख्या १ कोटी ५२ लाख ८५ हजार ४३९ इतकी असून, त्यापैकी ४४ लाख ३९ हजार ९७५ शेतकऱ्यांना दिनांक ३१ मार्च, २०२१ अखेर कृषीपंप वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेषत: विदर्भ, कोकण व मराठवाड्यात १ लाख ६ हजार ३४० शेतकऱ्यांनी कृषी पंपाची मागणीपत्रे भरुनही विदर्भातील ३८ हजार शेतकऱ्यांना अद्याप कृषीपंप वीज जोडण्या देण्यात आले नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित शेतकऱ्यांना कृषीपंप वीज जोडणी देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात दिनांक ३१ मार्च, २०२१ अखेर एकूण ४४,३९,९७५ इतक्या कृषीपंप वीज जोडण्या होत्या. सन २०२१-२२ मध्ये १,४५,८६७ व सन २०२२-२३ मध्ये १,७०,२६३ इतक्या कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या असून मार्च, २०२३ अखेर एकूण ४७,५६,१०५ इतक्या कृषीपंप वीज जोडण्या आहेत.
(२) हे खरे आहे. राज्यात दिनांक ३१ मार्च, २०२३ अखेर एकूण १,०६,३४० कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. त्यामध्ये विदर्भातील ३८,२८४ प्रलंबित कृषीपंपांचा समावेश असून सन २०२३-२४ मध्ये जून, २०२३ अखेर विदर्भातील ८७१३ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.
(३) सन २०२३-२४ मध्ये दिनांक ३०/०६/२०२३ पर्यंत राज्यात एकूण २४,३७४ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या असून त्यामध्ये विदर्भातील ८७१३ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. तसेच,"कृषीपंपवीजजोडणीधोरण-२०२०"अंतर्गतकृषीआकस्मिकतानिधीच्या उपलब्धतेनुसार व शासनाकडूनप्राप्तझालेल्यारुपये ८४९कोटीच्याभागभांडवलातूनकृषीपंपऊर्जीकरणाचीकामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरगांबाद जिल्ह्यात सिंचनासाठीच्या पाणी वापर संस्थांची स्थापना आणि नोंदणी करण्याकडे दुर्लक्ष होत असल्याबाबत

**(३०) * १९६५६ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरगांबाद जिल्ह्यात २००५ च्या शासन निर्देशानुसार सिंचनासाठी देण्यात येणाऱ्या पाण्याचे व्यवस्थापन पाणी वापर संस्थांच्या वतीने करण्याचे बंधनकारक असताना पाणी वापर संस्थांची स्थापना आणि नोंदणी करण्याकडे दुर्लक्ष होत असल्याची बाब माहे एप्रिल,२०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरगांबाद जिल्ह्याच्या लाभक्षेत्र विकास प्राधिकरण कार्यालयांतर्गत मोठे, मध्यम आणि लघु अशा एकूण १७२ धरणांतर्गत ४३२ पाणी वापर संस्था प्रस्तावित असल्या तरी प्रत्यक्षात केवळ ६३ संस्थाच कार्यान्वित झाल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परिणामी मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष वाढत असून सद्य:स्थितीत पश्चिम आणि उत्तर महाराष्ट्रातील पेरणी लायक ९७.६० लक्ष हेक्टर जमिनीच्या सिंचनासाठी ७४ टक्के पाणी उपलब्ध आहे, तर विदर्भातील ५६.७४ लक्ष हेक्टर क्षेत्रासाठी १८ टक्के पाणी उपलब्ध आहे आणि मराठवाड्यातील ५६.२८ लक्ष हेक्टर क्षेत्रासाठी केवळ ८ टक्के पाणी उपलब्ध आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उर्वरीत महाराष्ट्राच्या सिंचनाची बरोबरी करण्यासाठी मराठवाड्यासाठी इतर पाणी समृध्द क्षेत्रातून १५० टीएमसी पाणी आयात करावे लागेल व त्यासाठी नवीन सिंचन प्रकल्प प्रस्तावित करावे लागतील व या प्रकल्पांसाठी अंदाजे ३० हजार कोटी रुपयांची आवश्यकता असेल, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण (कडा) कार्यालयांतर्गत जायकवाडी, नांदूर मधमेश्वर आणि निम्न दुधना ही मोठी, २३ मध्यम १० उच्च बांध पातळी बंधारे आणि १३६ लघुपाटबंधारे प्रकल्प असून गेल्या अनेक वर्षापासून सिंचनाच्या पाण्याचे व्यवस्थापन पुरेसे न झाल्याने बीड, जालना, परभणी आणि औरगांबाद जिल्ह्यातील लाखो हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्याचे ध्येय कडा कार्यालयाचे असतानाही ते अद्याप पूर्ण झाले नसल्याने हजारो शेतकरी पाण्यापासूनअद्याप वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, उपरोक्त प्रकरणी पाणी नियोजन करण्याबाबत शासनाद्वारे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.

संबंधित मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद या प्रदेश कार्यालयाअंतर्गत ७० टक्के पदे रिक्त असून मागील चार वर्षांपासून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व प्रकल्प १०० % भरत असल्याने सिंचनाची नियमित कामे करावी लागत असल्याने पुरेशा मनुष्यबळा अभावी पाणी वापर संस्थांची नोंदणी कमी झाली आहे.
(२) अंशतः खरे आहे.

लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद या कार्यालयांतर्गत ३ मोठे, २३ मध्यम आणि १३६ लघु व १० उच्च पातळी बंधारे असे एकूण १७२ प्रकल्प आहेत. या प्रकल्पावर एकूण १२६ पाणीवापर संस्था आहेत व अद्याप एकूण ४४२ पाणी वापर संस्था स्थापन करावयाच्या आहेत.
(३) अंशतः खरे आहे विभागनिहाय क्षेत्र व पाणी उपलब्धीच्या तुलनेत सिंचनासाठीची टक्केवारी खालीलप्रमाणे आहे

| विभाग | लागवडी लायक क्षेत्र हजार हेक्टर | राज्याच्या तुलनेत टक्केवारी | प्रकलपीय उपयुक्त पाणीसाठा दलघमी | राज्याच्या तुलनेत टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| पश्चिम महाराष्ट्र कोकण उत्तर महाराष्ट्र सह | ९७६० | ४६.३४ | २६०८२ | ५९.३७ |
| मराठवाडा | ५६२८ | २६.७२ | ९०५९ | २०.६२ |
| विदर्भ | ५६७४ | २६.९४ | ८७९३ | २०.०१ |
| एकूण महाराष्ट्र | २१०६२ | १००.०० | ४३९३४ | १००.०० |

(४) हे अंशतः खरे आहे.

उत्तर कोकणातील नार-पार, अंबिका, औरंगा, दमणगंगा, वैतरणा व उल्हास नदी उपखोऱ्यात ३१७ अघफु अतिरिक्त पाणी शिल्लक आहे. त्यापैकी ११५ अघफु पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणेबाबतची तरतूद एकात्मिक राज्य जलआराखड्यात करण्यात आली आहे.

शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/(११२/२०१९)/जसंअ, दिनांक १७/०९/२०१९ अन्वये मा.कार्यकारी संचालक,गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली पश्चिम वाहिनी खोऱ्यातील (कोकण) अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळविण्यासाठी प्राथमिक अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती.

उपरोक्त समितीच्या अहवालात प्रवाही वळण योजनांव्दारे २३.९० अघफू व उपसा नदीजोड / वळण योजनांव्दारे ६६.०२ अघफू असे एकूण ८९.९२ अघफू पाणी वळविणेबाबत आखणी करून त्याबाबत शिफारस केली आहे.

उपरोक्तपैकी नवीन प्रस्तावित वळण योजनांव्दारे ६१.६६ अघफू पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याबाबतच्या योजनांचे सर्वेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.

दमणगंगा-वैतरणा-गोदावरी (७.१३ अघफू, प्रकल्पीय किंमत रुपये ६६६५ कोटी) व दमणगंगा-एकदरे-गोदावरी (५.०० अघफू, प्रकल्पीय किंमत रुपये १६०० कोटी) नदीजोड प्रकल्पाचे सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. पार-गोदावरी (३.४३ अघफू, प्रकल्पीय किंमत रुपये ३७१९ कोटी) नदीजोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडे प्रशासकीय मान्यता देण्याच्या दृष्टीने तांत्रिक तपासणीसाठी सादर केला असून त्यानुसार क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

उपरोक्त क्षेत्रिय स्तरावरील कार्यवाही पूर्ण करुन आवश्यक सर्व मान्यता प्राप्त झाल्यानतर राज्याच्या अर्थोपायाच्या स्थितीनुसार व मा.राज्यपाल महोदयांच्या निदेशाच्या अधीन राहून पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.

(५) हे खरे नाही.

लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबादची सन २०२२-२३ मध्ये निर्मित सिंचन क्षमतेच्या तुलनेत ७८ % प्रत्यक्ष सिंचन झाले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बहुतांश गृहप्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३१) * १९०५१ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या सहा वर्षांमध्ये महारेराकडे नोंदणी झालेल्या ८१ हजार गृहप्रकल्पांपैकी केवळ ११ हजार प्रकल्पच पूर्ण झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे उर्वरित प्रकल्प सहा वर्षांमध्ये पूर्ण झाले नाहीत की प्रत्यक्ष बांधकाम होऊनही विकासकांनी त्याचा पूर्णत्वाचा दाखला घेतला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महारेरात असलेली प्रकरणे मार्गी लावण्यास होत असलेल्या विलंबामुळे अनेक तक्रारदार आता ग्राहक न्यायालयात जात आहेत हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने "महारेरा"कडे ६ हजारांहून अधिक प्रकरणे प्रलंबित असून ती निकाली काढण्याबाबत तसेच विकासकांनी प्रकल्प पूर्ण करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१), (२) व (३) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण यांच्याकडे दिनांक २६/०६/२०२३ पर्यंत ४१३२९ प्रकल्प नोंदणीकृत झाले असून, त्यापैकी १२४०५ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. ७१७८ प्रकल्पांना महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणातर्फे मुदतवाढ देण्यात आली आहे. ज्या प्रकल्पांमधील विकासकांनी मुदतवाढीसाठी अर्ज केले नाही अथवा प्रकल्प वेळेत पूर्ण केलेले नाहीत अशा ६७०१ व्यपगत प्रकल्पांची (Lapsed Project) यादी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. व्यपगत प्रकल्पांतील विकासकांना नोटीसेस देऊन महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणतर्फे सुनावणी सुरु आहे. उर्वरित १५०४५ प्रकल्प प्रगतीपथावर आहेत.
(४) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणामध्ये आतापर्यंत नोंदणीकृत प्रकल्पांमध्ये २०९५३ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यापैकी १३८५० निकाली काढण्यात आल्या आहेत. उर्वरित तक्रारींवर सुनावणी सुरु आहे.
स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम २०१६ मधील कलम ३२ (ग) नुसार महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाने राज्यात सलोखा मंचाची स्थापना केली आहे. सदर सलोखा मंचामध्ये महाराष्ट्रातील नरेडको, एचसीएचआय, क्रीडाई संस्था व मुंबई ग्राहक पंचायतीचा समावेश आहे. सदर सलोखा मंच विकासक व ग्राहक यामध्ये समझोता घडवून आणतात व महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण येथे प्राप्त झालेल्या तक्रारींचे निवारण करण्यास मदत करतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील आदिवासी वस्त्यांचा विकास निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३२) * १९८८१ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील आदिवासी वस्त्यांचा विकास प्रलंबित असल्याची बाब माहे मे,२०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालघर ह्या नव्याने निर्माण झालेल्या जिल्ह्यास आदिवासींच्या विकासासाठी ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत जव्हार एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयाला केवळ ६ कोटी २१ लक्ष रुपये मंजूर झाले असून, सदर निधी कमी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जव्हार, मोखाडा, वाडा या प्रकल्पांतर्गत पालघर जिल्ह्यातील १३२ कोटी रुपयांच्या कामांची मागणी केली असतानाही केवळ ६ कोटी २१ लक्ष ९९ हजार रुपये एवढ्याच निधीला मान्यता दिली असल्याने पालघर जिल्ह्यातील आदिवासींचा विकास प्रलंबित राहणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नंदुरबार जिल्ह्यासाठी रुपये ७० कोटींहून अधिकचा निधी देण्यात येत असल्याने ठक्कर बाप्पा योजनेत पालघर जिल्ह्याला देण्यात आलेल्या रकमेत तातडीने वाढ करण्याची मागणी स्थानिक जनतेतून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठक्कर बाप्पा योजनेत पालघर जिल्ह्याला देण्यात आलेल्या रकमेत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, दिनांक ०३ फेब्रुवारी २०२३ अन्वये ठक्कर बाप्पा योजना सुधारित करण्यात आली असून सदर योजना सन २०२२-२०२३ पासून जिल्हास्तर व राज्यस्तरावरुन राबविण्याबाबतच्या सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेंतर्गत सन २०२२-२०२३ या वर्षात जिल्हास्तरावर नवीन कामांसाठी तरतूद केलेली नसल्याने योजनेकरीता राज्यस्तरावर केलेल्या आर्थिक तरतूदीपैकी ५० टक्के निधी संबंधित जिल्ह्याच्या आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात संबंधित जिल्ह्यांना राज्य लेखाशीर्षांतर्गत (२२२५ डी ७४३) वितरित करण्यास शासन निर्णय, दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२३ अन्वये मान्यता देण्यात आली. त्यानुसार पालघर जिल्ह्यासाठी रुपये १३.३० कोटी इतकी तरतूद करण्यात आली. याशिवाय मागील दायित्वा करीता जिल्हास्तरावर रुपये ५.०८ कोटी तरतूद ठेवण्यात आली होती. अशी एकूण १८.३८ कोटी रुपये इतकी तरतूद सन २०२२-२०२३ मध्ये पालघर जिल्ह्याकरीता करण्यात आली होती

उपरोक्त निधीतून पालघर जिल्ह्यातर्गत जव्हार प्रकल्पातंर्गत जिल्हास्तरावरून रुपये ६.२२ कोटी रक्कमेच्या ५३ विकास कामांना तर डहाणू प्रकल्पातंर्गत जिल्हास्तरावरून रुपये ११.५० कोटी रक्कमेच्या ८९ विकास कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच ठक्कर बाप्पा वस्तीसुधार योजना ही नियमित योजना असून सुधारित मार्गदर्शक सुचनांनुसार सदर योजनेंतर्गत दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या निधीतून आदिवासी वस्ती /गावांतर्गतची विकास कामांना राज्यस्तर व जिल्हास्तरावरुन मान्यता देवून निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

नंदुरबार जिल्ह्याकरीता रुपये १३.५८ कोटी तरतूद जिल्हास्तरावरुन घ्यावयाच्या कामांकरीता सन २०२२-२०२३ मध्ये राज्यस्तरावरून करण्यात आली होती. तर राज्यस्तरावरुन सन २०२२-२०२३ मध्ये रुपये १९.६७ कोटी रूपयाच्या कामांना मंजूरी देण्यात आली होती.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पदोन्नत पोलीस उपनिरीक्षकांना नियुक्ती व प्रशिक्षणाचे आदेश देवून वेतनश्रेणीचा लाभ देण्याबाबत

**(३३) * १८९०५ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १५६३९ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षकांना सातव्या वेतन आयोगाचा खंड–२ लागू न केल्याने पोलीस उपनिरीक्षकांच्या वेतनात तफावत निर्माण झाली असून केवळ सेवाज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षकांना सहायक उपनिरीक्षकाचे वेतन देण्यात येत असल्याचा प्रकार दिनांक ३० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गृह विभागाच्या दिनांक २५/०२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये किमान ३० वर्षे सेवा पूर्ण असलेले आणि सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर किमान ०३ वर्षे सेवा पूर्ण असलेले आणि आश्वासित प्रगती योजनेनुसार पोलीस उपनिरीक्षक संवर्ग पदाची वेतनश्रेणी घेत असलेले असे तीनही निकष पूर्ण करणारे सहायक पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील अंमलदारांना "सेवाज्येष्ठतेनुसार पोलीस उपनिरीक्षक पदावर नियमित पदोन्नती मिळेपर्यंत ते सहायक पोलीस उपनिरीक्षकाचीच काम पाहतील" असा निर्णय झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त शासन निर्णयातील निकषानुसार सुकाणू समितीने अंमलबजावणीमधील अडचणींबाबतच्या अहवालानुसार काही तांत्रिक बाबींचे निराकरण करण्याचे दृष्टीने वित्त विभागास सादर केलेल्या प्रस्तावास वित्त विभागाची मान्यता प्राप्त झाली आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्र पोलीस दलातील सेवाज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नती देण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षकांच्या वेतनातील अन्याय दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार पोलीस उप निरीक्षक या संवर्गाला वेतन स्तर १४ मध्ये वेतन मंजूर करण्यात आले आहे. सदर वेतन स्तरामध्ये सुधारणा करण्याबाबत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास राज्य वेतन सुधारणा समितीची मान्यता मिळालेली नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) राज्यातील पोलीस दलांतर्गत अंमलदार संवर्गातील पोलीस कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधीमध्ये वाढ व्हावी, एकूण तपासी अंमलदारांच्या संख्येत वाढ व्हावी या दृष्टीकोनातून शासन निर्णय, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणींच्या अनुषंगाने सुकाणू समितीद्वारा उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला. वित्त विभागाद्वारा यासंदर्भात विचारणा करण्यात आलेल्या अधिकच्या मुद्यांसंदर्भातील माहिती सद्य:स्थितीत एकत्रित करण्याची कार्यवाही पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडे सुरु असून सदरहू माहिती प्राप्त होताच येत असलेल्या अडचणींचे निराकरण वित्त विभागाच्या मान्यतेने करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## औरगांबाद शहरातील वाळुंज एमआयडीसीतील साजापुर शिवारातील गोदामावर छापा टाकून लाखो रूपयांचा गुटख्याचा साठा हस्तगत केल्याबाबत

**(३४) * १९३०२ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरगांबाद शहरातील वाळुंज एमआयडीसीतील साजापुर शिवारातील एका गोदामावर पोलीस उपायुक्तांनी छापा टाकून ४१ लाखो रूपयांच्या गुटख्यासह ट्रक, दोन कार असा एकूण ८१ लाखांचा मालसाठा जप्त केल्याचे माहे मार्च, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक पोलीसांना पुर्वकल्पना न देता ही कारवाई करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणातील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

सदरची कार्यवाही औरगांबाद पोलीस आयुक्तालयातील उप आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत करण्यात आली आहे.

(३) पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी., वाळुंज, औरगांबाद येथे दिनांक २९/०३/२०२३ रोजी गु.र.नं. २३३/२०२३ अन्वये कलम ३२८,४६७,१८८,२७२,२७३,३४ भा.दं.वि. सह कलम ५९ अन्न व सुरक्षा मानके अधिनियम २००६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात रूपये ४१ लाख, ४४ हजार रूपयाचा गुटखा आणि ४० लाख रूपये किंमत असलेले एक ट्रक, एक पिकअप वाहन व दोन कार अशी चार वाहने जप्त करण्यात आली आहेत.

सदर गुन्ह्यात ७ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी २ आरोपींना अटक करण्यात आली आहे व सदर गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## सिंचन घोटाळ्यातील आरोप असलेल्या अधीक्षक अभियंत्यांच्या पदोन्नतीबाबत

**(३५) * १९९२४ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंचन घोटाळ्यातील आरोप असलेल्या दोन अधीक्षक अभियंत्यांच्या पदोन्नतीसाठी महाराष्ट्र प्रशासकीय लवादापुढे दाखल याचिकांमध्ये राज्य शासनाने म्हणणे न मांडल्यामुळे त्यांना पदोन्नती देण्याचा एकतर्फी आदेश लवादाने माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाच लुचपत प्रतिबंधक खात्याकडून दाखल फौजदारी गुन्ह्यांमध्ये दोषारोप पत्र सादर करण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे सुनावणी मध्ये स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल मूळ अर्जाची मूळ प्रत अधिकृतरित्या अर्जदाराकडून अथवा मुख्य सादरकर्ता अधिकारी यांच्याकडून शासनास प्राप्त झाली नाही. क्षेत्रिय कार्यालयाकडून दिनांक ३०/०१/२०२३ रोजी सदर मूळ अर्जाची प्रत शासनास प्राप्त झाली. त्याअनुषंगाने परिच्छेदनिहाय अभिप्राय तयार करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु होती. तथापि, दरम्यानच्या कालावधीत मा.न्यायाधिकरणात शासनाची बाजू मांडण्यापूर्वी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर यांनी दिनांक ०७/०२/२०२३ रोजी प्रस्तुत प्रकरणी अर्जदारांच्या बाजूने आदेश पारित केले आहेत.

(२) हे खरे नाही. संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द दिनांक १७/०८/२०२० आणि दिनांक १२/०४/२०२१ रोजीच्या आदेशान्वये सक्षम न्यायालयात अभियोग दाखल करण्यास मंजुरी दिली आहे. सदर गुन्ह्यासंदर्भात इंजिनीअर वेलफेअर असोसिएशन, नागपूर यांचेकडून मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल क्रिमीनल रिट याचिका क्र.१०९४/२०१८ मध्ये मा.न्यायालयाने "Considering the grounds stated in this petition and also the relief sought, it would be appropriate to make the future actions relating to filing of the charge-sheet, if any, subject to the result of this petition and they are made so accordingly" असे आदेश दिले असल्यामुळे तसेच सदरहू रिट याचिका अद्यापही प्रलंबित असल्यामुळे लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून प्रस्तुत प्रकरणी मा.विशेष न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महावितरण कंपनीचा निष्काळजीपणा व गैरकारभारामुळे गत १० वर्षांमध्ये हजारो शेतकऱ्यांचा व प्राण्यांचा मृत्यू झाल्याबाबत

**(३६) * १९४८४ श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, श्री.एकनाथराव खडसे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीचा निष्काळजीपणा व गैरकारभारामुळे विदयुत वाहिन्यांच्या लोंबकळणाऱ्या तारा, वाकलेले विदयुत खांब, उघडे डीपी इत्यादीमुळे राज्यात गत १० वर्षांमध्ये तब्बल ५४६६ शेतकऱ्यांचा व ८०६४ प्राण्यांचा मृत्यू झाल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सदरची कामे करताना सबंधित कंत्राटदार व महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी अक्षम्य दुर्लक्ष करून, सदरची कामे निकृष्ट दर्जाची केल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, उक्त चौकशीच्या अनुषंगाने सबंधित कंत्राटदार व महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे. नैसर्गिक आपत्ती जसे वादळ वारा यामुळे उच्चदाब / लघुदाब वाहिन्यांचे खांब झुकणे, वाहिन्यांचे तारा तुटणे, भारीत वाहिनी / तारेचा अनावधानाने स्पर्श झाल्यामुळे, इत्यादी कारणांमुळे प्राणांतिक / अप्राणांतिक अपघात घडतात. सदरील कारणांमुळे गत १० वर्षात राज्यात ९०५९ मानवी विद्युत प्राणांतिक अपघात झाला व १४२६६ प्राण्यांचा विद्युत प्राणांतिक अपघात झाला.

(२) प्राणांतिक अपघात घडल्यास घटनास्थळाची विद्युत निरीक्षक यांच्याकडून तपासणी केली जाते व विद्युत निरीक्षक यांच्या अहवालानुसार महावितरण जबाबदार असल्यास महावितरण कंपनीच्या धोरणानुसार अपघातग्रस्ताच्या वारसास नुकसान भरपाई अदा करण्यात येते. तसेच सदरचे अपघात कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे घडल्यास संबंधित कंत्राटादारावर कंपनीच्या नियमाप्रमाणे कारवाई केली जाते. सदरील अपघातास विद्युत निरीक्षक यांच्या अहवालानुसार कंपनी कर्मचारी जबाबदार असल्यास त्यांची विभागीय चौकशी करुन त्यानुसार आरोप पत्र, निलंबन, वेतन कपात इत्यादी महावितरण कंपनीच्या नियमानुसार कारवाई केली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील पवन ऊर्जा निर्मितीला चालना देण्याबाबत.

**(३७) * १९७४२ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात पवनऊर्जा निर्मितीकरीता अनुकूल नैसर्गिक परिस्थिती असतानाही शेजारील सांगली व सातारा जिल्ह्याच्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यातील पवनऊर्जा निर्मिती केवळ १० टक्के इतकीच आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यात पवनऊर्जा निर्मितीसाठी संबंधित अधिकाऱ्यांनी पवनऊर्जा निर्मितीला अनुकूल नैसर्गिक परिस्थिती असतानाही त्यासाठी निश्चित धोरण आखून सदरची पवनऊर्जा निर्मिती करण्यामध्ये अक्षम्य दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील पवनऊर्जा निर्मितीत वाढ होण्याच्या दृष्टीने शासनाने याबाबत फेरआढावा घेवून पवनऊर्जा निर्मितीला चालना देणेबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

पवन ऊर्जा प्रकल्प हे मुख्यत: खाजगी गुंतवणूकदार/ विकासक यांच्यामार्फत उभारले जातात. कोल्हापूर जिल्ह्यातील पवन ऊर्जा निर्मितीक्षम ठिकाणी जंगलव्याप्त व डोंगराळ क्षेत्र असल्याने तसेच काही ठिकाणे जैवविविधता क्षेत्रामध्ये येत असल्याने (Eco Sensitive Zone) पवन ऊर्जा प्रकल्प उभारण्यास बंधने आहेत. याशिवाय पवन ऊर्जा प्रकल्पासाठी यंत्रसामुग्री / अवजड साहित्य वाहतुकीसाठी सातारा व सांगली जिल्ह्याच्या तुलनेत आवश्यक रस्त्यांची उपलब्धता नाही. त्यामुळे सातारा व सांगली

जिल्हयांच्या तुलनेत कोल्हापूर जिल्ह्यात खाजगी गुंतवणूकदार / विकासक यांच्याकडून पवन ऊर्जा प्रकल्पाच्या उभारणीस अल्प प्रतिसाद आहे.
(२) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ३१ ठिकाणी पवन वारा परिमापन केंद्रे उभारण्यात आली होती. त्यापैकी ८ ठिकाणे पवन ऊर्जा निर्मितीक्षम असल्याचे आढळून आले आहे. या ठिकाणांपैकी भेंडेवडे, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर या पवन ऊर्जा निर्मितीक्षम ठिकाणी एकूण ६६.६५ मे.वॅ. क्षमतेचा पवन ऊर्जा प्रकल्प खाजगी गुंतवणूकदार / विकासक यांनी आस्थापित केला आहे.
(३) गुंतवणूकदारांना तसेच विकासकांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजी अपारंपारिक ऊर्जा धोरण २०२० जाहीर केले असून दिनांक ३० जून २०२२ रोजी या धोरणातंर्गत प्रोत्साहनात्मक सुधारणा जाहीर केल्या आहेत. या धोरणानुसार सन २०३० पर्यंत पवन ऊर्जा निर्मितीचे २५०० मेगावॅट इतके उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यात विद्युत ग्राहकांना नवीन विदयुत जोडणी व जुने विदयुत मीटर बदलून देण्याबाबत

**(३८)** * **१८८५६ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यात घरगुती अथवा व्यावसायिक नवीन विद्युत जोडणी घेताना किंवा जुने विद्युत मीटर बदलतांना, विदयुत वितरण कंपनीकडे नवीन मीटरच उपलब्ध नसल्याने विदयुत ग्राहकांना कंपनी कार्यालयाकडे वारंवार पाठपुरावा करावा लागत असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यातील अनेक ग्राहकांनी विदयुत जोडणीसाठी विदयुत मंडळाकडे सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) भरुनही अनेक महिने वीज मीटर उपलब्ध होत नसल्याचेही त्याचदरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विदयुत कंपनीकडे विदयुत मीटरचा तुटवडा असल्याने कंपनीने सांगली शहर आणि जिल्ह्यामध्ये नवीन विदयुत जोडणी देण्याचे बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनंतर नवीन विदयुत जोडणी व जुने मीटर बदलून देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सांगली मंडळ कार्यालया अंतर्गत माहे एप्रिल, २०२३ ते जून, २०२३ दरम्यान पैसे भरलेल्या घरगुती व व्यावसायिक ८.०११ ग्राहकांपैकी ६,७५१ ग्राहकांना वीज जोडण्या देण्यात आलेल्या असून उर्वरीत १,२६० जोडण्या देण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(२) हे खरे नाही.

सांगली मंडळ कार्यालयाअंतर्गत आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये घरगुती व वाणिज्य अशी एकूण २८,६९४ तसेच एप्रिल, २०२३ ते जून, २०२३ दरम्यान ६,७५१ वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.
(३) व (४) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत सांगली मंडळ कार्यालया अंतर्गत क्षेत्रिय कार्यालयाकडे सिंगल फेज १२, ५५४ व थ्री फेज मीटरचा २,२०० नग साठा उपलब्ध आहे. नवीन वीज ग्राहकांसाठी वीज मीटरचा पुरेसा साठा उपलब्ध असून मीटरअभावी वीज जोडण्या प्रलंबित राहणार नाहीत, याची दक्षता घेण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चाळीसगाव, भडगाव, पाचोरा (जि.जळगाव) येथील बलून बंधाऱ्यांचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(३९) * १९२७९ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव, भडगाव, पाचोरा (जि.जळगाव) येथील पिण्याचे पाणी व सिंचनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी गिरणा नदीवर बलून बंधारे बांधकामास मंजुरी मिळूनही १०० टक्के खर्च केंद्राने करण्याच्या अटीमुळे सदर प्रकल्पाचा खर्च वाढल्याने कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पास राज्य शासनाचा निधी उपलब्ध करून देणेबाबत तसेच प्रलंबित कामे जलदगतीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, खरे आहे.
(२) १.गिरणा नदीवरील प्रस्तावित ७ बंधाऱ्यास दिनांक २८/१२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार रुपये ७११.१५ कोटी साठी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर मान्यता ही गिरणा नदीवरील प्रस्तावित ७ बंधाऱ्यास लागणारा १०० % खर्च हा केंद्र शासनाकडुन उपलब्ध होणाऱ्या अर्थसहाय्यातुन करण्यात यावा या अटीच्या अधिन राहुन मान्यता देण्यात आली आहे.
२. सदर प्रकल्पास राज्य वित्त विभागाची रुपये ७११.१५ कोटीच्या प्रस्तावास दिनांक ०७/१२/२०१९ अन्वये मान्यता प्राप्त आहे.
३. परंतु केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली येथे दिनांक ०९/१२/२०१९ रोजीच्या १४३ व्या बैठकीत (TAC Meeting) प्रकल्पाच्या रुपये ७८१.३२ कोटी किंमतीच्या प्रस्तावास “पर्यावरण मान्यता व रुपये ७८१.३२ कोटी किंमतीस राज्य वित्त विभागाची मान्यता (SFC) प्राप्त करून घेणे व फेरसादर करणे” या अटीच्या अधिन राहुन मान्यता देण्यात आली आहे.
४. तसेच सदर प्रकल्पास पर्यावरण मान्यता पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई (SEIAA- State Environment Impact Assessment Authority) यांचे इंग्रजी पत्र No.SIA/MH/RIV/२०१९२८/२०२१ दिनांक ०६/०८/२०२२ अन्वये अंतिम मान्यता प्राप्त आहे.

५. सदर प्रकल्पाचा प्रथम सुधारीत प्रशासकीय अहवाल रुपये १२७५.८२ कोटीचा प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांना महामंडळाचे पत्र जा.क्र.कासं/तापाविम/प्रशा-५/५०८५/सन २०२२ दिनांक १३/१२/२०२२ अन्वये सादर करण्यात आले आहे.
६. तरी सदर प्रकल्पास प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर राज्य वित्त विभागाची (SFC) मान्यता घेउन सदर प्रस्ताव केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली यांना पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) प्रस्तावित असलेले खिंडसी फिडर नहर योजना निधी अभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत.

**(४०) * १९३१३ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) पेंच प्रकल्पाचा एक भाग असलेल्या महत्वाकांक्षी परियोजनेंतर्गत खिंडसी फिडर नहर योजनेला सन २००९ ला प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, खिंडसी तलाव मधील पाणी पूर्णतः उपयोगात आणण्यासाठी सिंचन विभागातर्फे या योजनेचा प्रस्ताव तयार करून २६६.३१ कोटी रूपये सर्वेक्षण व आवश्यक कार्यवाही करण्याकरीता खर्च होवूनही अद्यापही ही योजना अपूर्ण असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेमध्ये खिंडसी तलाव पूर्णतः भरल्यानंतर पेंच प्रकल्पाच्या लाभक्षेत्राअंतर्गत पेंच या गावांच्या शेतकऱ्यांकरीता सिंचन हेतू पाणी उपलब्ध होणार होते हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या योजनेतील शिर्षविमोचक व जलसेतू करीता असलेल्या निर्माण कार्याला प्रशासकीय मान्यता न मिळाल्यामुळे तथा दायित्व मंजुरी हेतू निधीअभावी ही योजना थांबविण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आवश्यक कामाकरीता प्रशासकीय मान्यता देवून प्रलंबित असलेला निधी व पूर्ण योजना कार्यान्वित करणे हेतू आवश्यक निधीची पूर्तता करून योजना पूर्णत्वास नेण्याबाबत कोणती कायर्वाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
नागपूर जिल्ह्यातील रामटेक तालुक्यातील पेंच प्रकल्पाचा एक भाग असलेला महत्वाकांक्षी परियोजनेंतर्गत खिंडसी फिडर कालवा योजनेला पेंच पाटबंधारे प्रकल्पामध्ये समाविष्ट करून सदर कामास दिनांक १४/०८/२००९ अन्वये द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता तसेच दिनांक ०९/०३/२०२३ अन्वये तृतीय प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
खिंडसी पुरक कालवा योजनेतील कालवा कामाच्या व त्यावरील बांधकाम मे. डी. एन. सी. सी. ॲन्ड आय.एन.एन.आय (जेव्ही) हुबली कर्नाटक यांना देण्यात आले असून आतापर्यंत करारनामा अंतर्गत ९० टक्के काम पूर्ण झालेली असून कंत्राटदारास रुपये २३३.३९ कोटीचे भुगतान करण्यात आलेले आहे.

या कामावर रुपये ६०.२८ कोटीचे निविदा अधिक्य निर्माण झालेले असून कंत्राटदारास रूपये ६.३४ कोटीचे भुगतान न झाल्याने कंत्राटदाराने दिनांक २२/०४/२०१८ पासून काम बंद केलेले आहे. तसेच सा.क्र. (-)११९ मी. ते सा.क्र.(+) ७८० मी. मधील विमोचक व जलसेतुच्या बांधकामास सुरुवात झालेली आहे. सा.क्र.७८० मी ते सा.क्र.१५०० मी.मधील बांधकामाची संकल्पने तयार करणे सुरु असून निधीच्या तरतुदीनुसार सदरची कामे हाती घेणे नियोजित आहे.

(३) होय हे खरे आहे.

खिंडसी तलाव पूर्णत: भरल्यानंतर पेंच प्रकल्पाच्या लाभक्षेत्रांतर्गत पुच्छ भागातील गावांच्या शेतकऱ्यांकरीता सिंचनाकरीता पाणी उपलब्ध होणार आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

खिंडसी फिडर कालवा योजना समाविष्ट असलेल्या पेंच प्रकल्पास शासन निर्णय क्र. सुप्रमा -२०२२/३६२) प्र.क्र. १०३) मोप्र -२ दिनांक ०९/०३/२०२३ अन्वये तृतीय प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. या योजनेतील सा.क्र. (-) ११९ ते (-) ४९ वरिल शिर्ष विमोचक व सा. क्र. (-) ४९ ते सा. क्र. (+) ७८० वरिल जलसेतूच्या बांधकामाची निविदा प्रक्रीया पूर्ण होऊन बांधकामास दिनांक २०/०४/२०२३ ला सुरुवात झालेली असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

खिंडसी पूरक कालवा योजनेतील कालवा कामाच्या व त्यावरील बांधकामाच्या निविदेवर रुपये ६०.२८ कोटीचे दायित्व निर्माण झालेले असून झालेल्या कामाचे कंत्राटदारास रुपये ६.३४ कोटीचे भुगतान न झाल्याने कंत्राटदाराने दिनांक २२/०४/२०१८ पासून काम बंद केलेले आहे. उर्वरीत कामे नविन निविदेद्वारे निधीच्या उपलब्धतेनुसार करण्याचे नियोजित आहे.

(५) खिंडसी फिडर कालवा योजना समाविष्ट असलेल्या पेंच प्रकल्पास दिनांक ०९/०३/२०२३ अन्वये रुपये १६८५.८८ कोटी इतक्या किंमतीस तृतीय प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून या मध्ये खिंडसी पूरक कालवा योजनेकरीता रुपये ४२५.७३ कोटी ची तरतूद आहे. पेंच प्रकल्पास चालू वर्ष सन २०२३-२४ मध्ये रुपये ६५ कोटी ची तरतूद आहे. सन २०२३-२४ मध्ये खिंडसी पूरक कालवा योजनेच्या कामाची रूपये ५८.१० कोटी लक्ष ची प्रापणसूची मंजूर आहे.

या योजनेतील सा. क्र. (-) ११९ ते (-) ४९ वरील शिर्ष विमोचक व सा.क्र.(-)४९ ते (+) ७८० मी. वरील जलसेतूच्या बांधकामास दिनांक २०/०४/२०२३ रोजी सुरुवात झालेली असून सदर काम प्रगतीपथावर आहे. तसेच उर्वीरत सा.क्र. ७८० ते १५०० मी वरील बांधकामाबाबत सर्वेक्षण/ संकल्पन व निविदा करून कामास सुरुवात करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील लक्ष्मणरावजी इनामदार उपसासिंचन योजना जिहे-कठापुर अंतर्गत मौजे रामोशीवाडी, भाटमवाडी, खिरखिंडी, शेल्टी, चिमणगांव या गावांना पाणी मिळणेबाबत

**(४१)** * **२०००८ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लक्ष्मणरावजी इनामदार उपसासिंचन योजना जिहे-कठापुर (ता.कोरगांव, जि.सातारा) या योजनेपासून कायमस्वरुपी पिण्याचे पाणी मिळणेसाठी वर्धनगड बोगद्याच्या सुरुवातीस दाबहरण कुंडास असणाऱ्या

वॉल्व्हमधुन, रामोशीवाडी पाझर तलावामध्ये पाणी सोडल्यामुळे रामोशीवाडी, भाटमवाडी, खिरखिंडी, शेल्टी, चिमणगांव (ता.कोरेगांव) इ. गावातील ग्रामस्थांना पिण्याचे पाणी उपलब्ध होत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीचा विचार न करता प्रशासनाने सदर दाबहरण कुंडाचा वॉल्व्ह कायमस्वरुपी बंद करण्याचा निर्णय घेतल्याने वरील गावांना पिण्याचे पाणी न मिळाल्याने सदर गावांवर दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊन पुन्हा पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरु करावा लागेल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रामोशीवाडी, भाटमवाडी, खिरखिंडी, शेल्टी, चिमणगांव (ता.कोरेगांव) इ. गावांना वर्धनगड बोगद्याच्या सुरुवातीस असणाऱ्या दाबहरण कुंडाच्या वॉल्वमधून कायमस्वरुपी पाणी उपलब्ध करुन देऊन सदरची गावे कायमची टँकरमुक्त करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

गुरूवर्य कै. लक्ष्मणरावजी इनामदार उपसा सिंचन योजना (जिहे कठापूर), जि.सातारा या बांधकामाधीन प्रकल्पाचे एकूण लाभक्षेत्र २७५०० हे. असून त्यापैकी खटाव तालूक्याचे ११७०० हे. तर माण तालूक्याचे १५८०० हे. लाभक्षेत्र आहे. या योजनेतंर्गत कोरेगांव तालुक्यातील कोणतेही लाभक्षेत्र येत नाही. प्रकल्पांतर्गत ३.१७ टीएमसी पाणी उपरोक्त २७५०० हे. क्षेत्रास सिंचनासाठी देण्याचे नियोजित आहे. मंजूर प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पांतर्गत पिण्याच्या पाण्याची कोणतीही तरतूद नाही.

(२) हे खरे नाही.

याप्रकरणी जिल्हाधिकारी, सातारा यांनी दिनांक ०६/०७/२०२३ अन्वये शासनास सादर केलेल्या अहवालानुसार मौ. रामोशीवाडी, भाटमवाडी, शेल्टी ता.कोरेगांव या तीन गावांसाठी खिरखिंडी तलाव स्त्रोतातून राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमातून नवीन नळ पाणीपुरवठा योजना पूर्ण होऊन सन २०२० मध्ये सबंधीत गावांना हस्तांतरीत झालेली आहे. तद्नंतर सबंधित गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागला नाही. तसेच खिरखिंडी, चिमणगांव (बोधेवाडी) या गावांना सन २०२२-२०२३ मध्ये टँकरने पाणीपुरवठा करावा लागला नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मंत्रालयात सचिव असल्याचे सांगून नोकरीचे आमिष दाखवून तीन जणांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याबाबत

**(४२) * २०२३३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंत्रालयात सचिव असल्याचे सांगून लिपिक, तसेच चालकपदी नोकरी लावण्याचे आमिष दाखवून एका तरुणीसह तीन जणांची १६ लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात दादर (मुंबई) येथील तरुणीने दादर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले तदनुसार दोषी आरोपीस अटक करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

फिर्यादी व अन्य दोघांना लिपिक तसेच वाहनचालक पदावर नोकरी लावण्याचे अमिष दाखवून त्यांची रुपये १६,१३,५००/- इतकी फसवणूक केल्याप्रकरणी फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन दादर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. १३३/२०२३ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात दोन आरोपींना अटक करण्यात आली होती, प्रकरणी तपास पूर्ण करुन मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलें यांचेविषयी आक्षेपार्ह लेख लिहिणाऱ्या संकेतस्थळांवर कारवाई करण्याबाबत.

**(४३) * २०४५८ श्री.अनिकेत तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याविषयी "इंडिक टेल्स" आणि "हिंदू पोस्ट" या संकेतस्थळावर आक्षेपार्ह लिखाण करण्यात येऊन स्त्री शिक्षणांच्या जनक यांची नाहक बदनामी करण्यात आल्याचे दिनांक २ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याविरोधात आक्षेप नोंदवून मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा) यांचेसह मा.लोकप्रतिनिधी तसेच राजकीय संघटना, सामाजिक संस्थांनी सदरसंकेतस्थळावर बंदी आणून आक्षेपार्ह लेख लिहिणाऱ्या लेखकांवर व अन्य संबंधितांविरुध्द फौजदारी कारवाई जलदगतीने करावी अशी मागणी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली असल्याचे त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर कडक कारवाई करावी असे आदेश मा.मुख्यमंत्री महोदय यांनी मुंबई पोलीस आयुक्त यांना त्याचवेळी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या वेबसाईटवर बंदी घालण्याबाबत तसेच सतत आक्षेपार्ह लिखाण करणाऱ्या लेखक व संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) (२) व (३) हे खरे आहे.
(४) सदर आक्षेपार्ह मजकूर संकेतस्थळावरुन काढून टाकण्यात आला असून, यासंदर्भात आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई येथे दिनांक ३१/०५/२०२३ रोजी कलम ५००,५०५ (२) भा.द.वि. अन्वये गुन्हा क्र. ११८/२०२३ दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कांदिवली (मुंबई) येथे आकुर्ली विभागात विकासकाने सुमुख हिल्स ही बेकायदेशीर इमारत उभी केली असल्याबाबत

**(४४) * १९६१९ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (मुंबई) येथे आकुर्ली विभागात योगसिद्धी डेव्हलपर या विकासकाने झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून तसेच पर्यावरण नियमांचे उल्लंघन करून झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतंर्गत शासकीय भूखंडावर सुमुख हिल्स नावाची बेकायदेशीर इमारत उभी केली असल्याची बाब दिनांक ३० मे, २०२३ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना राबविण्याकरीता बनावट महामार्ग एनओसीचा वापर केला असून सदर एनओसी सार्वजनिक बांधकाम विभागाने दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण गैरव्यवहार प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदेशीर इमारत उभी करणाऱ्या संबंधित विकासकावर आणि अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदर योजनेसाठी कार्यकारी अभियंता, रस्ते विकास विभाग क्र.४, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी दिनांक १५/०२/२००१ रोजीच्या पत्रान्वये ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केलेले आहे. सदरचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही मुंबई महामार्ग अधिनियम, १९५५ अन्वये करण्यात आल्याची धारणा असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी दिनांक २९/११/२०२१ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) मौजे आकुर्ली, कांदिवली (पूर्व) मुंबई येथील न.भू.क्र.१४७ या ७७६७.२० चौ.मी. शासकीय जमिनीवरील बाणडोंगरी एकता सह.गृह.नि.संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस दिनांक २१/०६/२००७ रोजी प्रथम आशयपत्र तर दिनांक ०७/१२/२०२२ रोजी सुधारित आशयपत्र देण्यात आले आहे.

योजनेमध्ये पुनर्वसन विंग A व B आणि विक्री घटक विंग C, D, E व F अशी संयुक्त इमारत बांधण्यात आली असून दिनांक ०७/१२/२०२२ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

सदर योजनेस पर्यावरण विभागाने दिनांक २९/०४/२०१४ रोजीच्या पत्रान्वये परवानगी दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य पोलीस दलातील पोलीस उप निरीक्षक पदासाठी मर्यादीत विभागीय परीक्षा घेणेबाबत

**(४५) * १९७४७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस दलात शिपाई म्हणून भरती झालेल्या पोलिसांना अधिकारी होता यावे, यासाठी पोलीस दलामध्ये उपनिरीक्षक पदाच्या राखीव असलेल्या ७५० जागांसाठी सन २०२१ ते २०२३ या तीन वर्षांमध्ये परीक्षा घेण्यात येणार असल्याची बाब दिनांक ८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, यातील केवळ २५० जागांसाठी सन २०२१ मध्ये परीक्षा झाली त्यानंतर रिक्त ६०० जागांसाठी परीक्षा झालेली नसून, या वर्षाअखेरीस या परिक्षेची मुदत संपणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,पोलीस महासंचालक कार्यालयाने परीक्षा घेण्याबाबत गृह विभागास कळविले असूनही अद्यापही परीक्षा घेण्यात आली नसल्याने अनेक कर्मचाऱ्यांचे वय वाढत असल्याने खात्यांतर्गत परीक्षा देऊन अधिकारी होण्याचे त्यांचे स्वप्न अधुरे राहत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू परीक्षा तातडीने घेण्याबाबत शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) पोलीस उपनिरीक्षक या पदाच्या सेवाप्रवेश नियमामधील तरतुदीनुसार पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची २५% पदे मर्यादित विभागीय परिक्षेद्वारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येतात.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून २५० पदांसाठी मर्यादित विभागीय परीक्षा - २०२१ घेण्यात आली असून आयोगाने शिफारस केलेल्या २५० उमेदवारांचे प्रशिक्षण महाराष्ट्र पोलीस अकादमी,नाशिक येथे सुरु आहे.

यापुढील मर्यादित विभागीय परिक्षेच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली असून ६१५ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे व परीक्षेबाबतची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुपवाड (जि.सांगली) एमआयडीसीतील उद्योजकांना वाढीव वीज देण्यास विलंब करणाऱ्या विदयुत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४६) * १८८६१ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाचे उद्योजकांना २१० अश्वशक्तीपर्यंत वीजेचा पुरवठा करण्याचे धोरण असून, त्यानुसार कुपवाड (जि.सांगली) एमआयडीसीकडे अनेक उद्योजकांनी महावितरणाकडे २५ ते १०० अश्वशक्तीच्या वाढीव वीजेची मागणी केली असता, महावितरण कंपनीने त्यासाठी आर्थिक तरतूद नसल्याचे सांगून वाढीव वीज देण्यास नकार दिला तसेच वाढीव वीज हवी असल्यास त्या-त्या उद्योजकांनी नवीन रोहित्र संच उभारणीचा खर्च करुन त्यानंतर वीज जोडणी करुन देण्याचा विचार करण्यात येईल असे महावितरण अधिकाऱ्यांकडून उद्योजकांना सांगण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुपवाड एमआयडीसीतील उद्योजकांनी वाढीव वीजेच्या मागणीसाठी कृष्णा व्हॅली चेंबरचे अध्यक्ष व इतर संचालकांनी कुपवाड एमआयडीसीत नवीन सबस्टेशनसाठी शासनाकडे केलेल्या भूखंडाच्या मागणीस एमआयडीसीने सहमती दर्शविली आहे, परंतु महावितरण योग्य त्या कागदपत्राची पूर्तता न करता विलंब करीत असल्याचे दिनांक १३ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महावितरण कंपनीने भूखंड ताब्यात घेतल्यास कुपवाड एमआयडीसीत नवीन सबस्टेशन उभे राहून त्याचा सुक्ष्म व लघु उद्योजकांना वाढीव वीजेचा पुरवठा करणे सोईस्कर होईल अन्यथा महावितरणने उद्योगांना वाढीव वीजेचा पुरवठा करीत नसल्याच्या कारणास्तव आणखी काही उद्योग परराज्यात जाण्यांच्या तयारीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कुपवाड (जि.सांगली) एमआयडीसीतील उद्योजकांना वाढीव वीज देण्यास टाळाटाळ करणाऱ्या विदयुत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

सांगली शहर अंतर्गत कुपवाड एमआयडीसीचे कार्यक्षेत्र समाविष्ट आहे. सदर एमआयडीसीमधील औद्योगिक ग्राहकांकडून नवीन वीज जोडणी व वाढीव भाराची मागणी वेळोवेळी होत असते. नवीन वीज जोडणी ही आहे त्या रोहित्रावरुन (लोड शिल्लक असल्यास) तसेच महावितरण कंपनीच्या NSC या योजनेतून करण्यात येते. ग्राहकांनी मागणी केल्यास १.३% ग्राहकाधिष्ठीत वितरण योजनेंतर्गत (DDF) ग्राहकांमार्फत स्वखर्चाने करण्यात येते.

वाढीव अश्वशक्ती वीजेची (Load) मागणी असल्यास व सद्य:स्थितीत उपलब्ध असलेल्या रोहित्रावर वाढीव मागणीचा भार शिल्लक असल्यास त्वरीत वाढीव वीज (Load Extension) ग्राहकास देण्यात येते. परंतु वाढीव भार शिल्लक नसल्यास ग्राहकास १.३% ग्राहकाधिष्ठीत वितरण योजना (DDF) योजनेमधुन चालु रोहित्राची क्षमतावृध्दी किंवा अतिरिक्त रोहित्र स्वखर्चाने उभारण्याबाबत कळविण्यात येते. त्या अनुषंगाने दिनांक ०१/०४/२०२३ पासून ते आजअखेर एमआयडीसी कुपवाडमध्ये वरीलप्रमाणे एकूण १४ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी १३ ग्राहकांच्या भार वाढीचे प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले आहेत.
(२) हे खरे नाही.

सदर प्रस्तावित उपकेंद्र उभारणीकरीता आवश्यक असलेल्या जागेकरीता एमआयडीसी प्राधिकरणाकडे प्रस्ताव महावितरणच्या विभागीय कार्यालयाचे पत्र क्र.३९९७ दिनांक १६/१२/२०२१ नुसार सादर केला होता.त्या अनुषंगाने एमआयडीसी प्राधिकरणाने ४८०० चौ.मी. जागा उपलब्ध होऊ शकणार नसल्याचे पत्र क्र. २०२२१२००२०७४/२०२२ अन्वये कळविले होते. पुनश्चः दिनांक ३१/०५/२०२२ अन्वये महावितरणमार्फत विनंती करण्यात आली होती. एमआयडीसी प्राधिकरणाकडून त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडे याबाबत पाठपुरावा सुरु आहे.
(३) हे खरे नाही.

(४) एमआयडीसीकडून उपरोक्त उभारणीकरीता जागा उपलब्ध झाल्यावर उपकेंद्राचे काम सुरु करण्याचे नियोजित आहे. महावितरणच्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यातील तामसवाडी गावाचे पुनर्वसन करून वरखेडे-लोंढे बॅरेज सुरु करण्याबाबत.

**(४७) * १९२८० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव व भडगाव तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी उपयुक्त असलेल्या वरखेडे-लोंढे बॅरेज चे काम पूर्ण झालेले असून, तामसवाडी गावाच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित असल्याने त्यात पाणीसाठा करण्यात येत नाही याबाबत ग्रामस्थांनी दिनांक ७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त गावाचे पुनर्वसन करून वरखेडे-लोंढे बॅरेज सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे तामसवाडी गावठाणाचे पूर्णत: पुनर्वसन झाल्याशिवाय धरणात पाणीसाठा करता येणे शक्य नाही.तथापि, याबाबत ग्रामस्थांनी दिलेले निवेदन अद्यापपर्यंत विभागास प्राप्त नाही.
(२) मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण तथा राज्य पुनर्वसन व पुनर्स्थापना संनियंत्रण समिती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३/०७/२०२१ रोजी झालेल्या बैठकीत मौजे तामसवाडी ता.चाळीसगांव या गावाचे विशेष बाब म्हणुन १००% पुनर्वसन होणे बाबतच्या प्रस्तावास महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण यांनी मान्यता प्रदान केलेली आहे.

तामसवाडी गावाचे (पूर्णत: १०० % पुर्नवसन) पुनर्वसन करणेची कलम ११ (१) ची अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-१ मध्ये दिनांक ९ ते १५ डिसेंबर, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तामसवाडी गावाचे (पूर्णत: १०० % पुर्नवसन) पुनर्वसन करण्याकरीता मौजे पिलखोड, ता.चाळीसगांव येथील १९.६९ हे.आर. खाजगी क्षेत्राचा भूसंपादन करणे प्रस्तावित आहे. तथापि, सदर भुसंपादनास भुधारकांनी हरकत घेतलेली आहे.

सदर प्रकरणी, तामसवाडी गावठाणातील कुटुंब सर्वेक्षण व गणना सर्वेक्षण प्रगतीपथावर आहे. तसेच आवश्यक खाजगी जमिनीचे भुसंपादन करण्यासाठी देखील कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैनगंगा - नळगंगा नदी जोड प्रकल्पातील त्रुटींची पुर्तता करणेबाबत

**(४८) * १९३१४ श्री.चंद्रशेखर बावनकुळे : दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक १४३६३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाची आवश्यक मंजुरी प्राप्त झालेल्या तसेच विदर्भाच्या विकासात महत्वपूर्ण भुमिका असलेल्या वैनगंगा - नळगंगा नदीजोड - गोसेखुर्द प्रकल्पातून जोड कालव्याद्वारे अतिरिक्त पाणी बुलढाणा जिल्ह्यात नळगंगा प्रकल्पापर्यंत आणण्याकरीता ही योजना प्रस्तावित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आत्महत्याग्रस्त विदर्भासाठी हा प्रकल्प महत्वपूर्ण असून प्रत्यक्षात आणण्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण व केंद्राच्या पर्यावरण विभागाची मान्यता आवश्यक आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील ७ जिल्हयांमधील १८ तालुक्यातील ३ लक्ष ७१ हजार २७७ हेक्टर क्षेत्र या प्रकल्पामुळे सिंचनाखाली येत असून यात नागपूर विभागातील १ लक्ष ४८ हजार ९७२ हेक्टर तर अमरावती विभागातील २ लक्ष २२ हजार ३०५ हेक्टर क्षेत्राचा समावेश असून संपूर्ण क्षेत्र सिंचन क्षेत्रात समावेशित होते हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेच्या त्रुटींची पुर्तता तातडीने करण्याकरीता तथा केंद्राच्या पर्यावरण विभागाची मान्यता घेवून प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनान कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, अंशत: खरे आहे.

विदर्भातील ६ जिल्ह्यामधील १५ तालुक्यातील ३ लक्ष ७१ हजार २७७ हेक्टर क्षेत्र या प्रकल्पामुळे सिंचनाखाली येत असून यात नागपूर विभागातील १ लक्ष ४८ हजार ९७२ हेक्टर तर अमरावती विभागातील २ लक्ष २२ हजार ३०५ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे.

(४) वैनगंगा-नळगंगा नदीजोड योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालाची राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडून छाननी पूर्ण झालेली आहे. तद्नंतर राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या छाननी अहवालातील मुद्यांच्या अनुपालन अहवालासोबत प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरीता शासनास प्राप्त झाला आहे. तथापि, शासन निर्णय दिनांक २३/११/२०१६ नुसार २००० हेक्टरपेक्षा मोठ्या उपसा सिंचन योजना शासकीय खर्चाने हाती घेण्यासाठी मान्यता देण्याचे अधिकार मा.मुख्यमंत्री यांना आहेत. त्यानुसार, सदर योजनेसाठी मा.मुख्यमंत्री महोदयांची मान्यता नुकतीच प्राप्त झाली आहे. तसेच, सदर प्रकल्पास, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ कलम ११ (च) अंतर्गत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर मान्यतेसाठीचा प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयामार्फत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांना सादर करण्यात आला असून छाननी प्रगतीत आहे. सदर प्रकल्पास महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांची मान्यता प्राप्त झालेनंतर राज्याच्या अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपाल यांचे निदेशानुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करणे शक्य

आहे. प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर केंद्रीय पर्यावरण मान्यता तसेच इतर वैधानिक मान्यतेबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिरारोड (जि.ठाणे) येथे प्रियकराने प्रेयसीची अत्यंत विकृत प्रकारे हत्या केल्याबाबत

**(४९) * २०२७३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरारोड (जि.ठाणे) येथे ‘लिव्ह इन रिलेशनशिप’मध्ये राहणाऱ्या प्रियकराने प्रेयसीची निर्घृण हत्या करुन तिच्या शरीराचे धारदार शस्त्राने लहान लहान तुकडे करुन विल्हेवाट लावून पुरावा नष्ट करण्याची विकृत मनोवृत्तीची घटना दिनांक ७ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित व्यक्तीस अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय. दिनांक ०७/०६/२०२३ रोजी सदर घटना उघडकीस आलेली आहे
(२) सदर घटनेबाबत दिनांक ०७/०६/२०२३ रोजी गु.र.क्र. ३०६/२०२३, भा.द.वि. कलम ३०२, २९७, २०१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात आरोपीतास अटक करण्यात आलेली असून सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१ (का.),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.